म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
दा. क्र. २०५९०

IRBK 120590
IRBK-0120590

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
बा. क्र. २०५९० नों. दि. ...............
... क्र. २१९९/[illegible]
वि. ......नाटक

वाचनालय
नाटक
२०५९०
२१११८४

# दोन ध्रुवांवर दोघे आपण

वसंत कानेटकर

IRBK-0120590

'इंद्रायणी साहित्य'

© वसंत कानेटकर

पहिली आवृत्ती
सप्टेंबर १९६३

दुसरी आवृत्ती
सप्टेंबर १९८४

■ या नाटकाच्या प्रयोगाचे, भाषांतराचे, चित्रपटाचे इत्यादि सर्व हक्क सौ. उषा वसन्त कानेटकर यांच्या स्वाधीन आहेत.

■ आगाऊ लेखी परवानगीशिवाय या नाटकाचा कोणीही प्रयोग करू नये.

■ तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी परवानगी आणि लेखकाचे मानधन या संबंधांत सौ. उषा वसन्त कानेटकर, ' शिवाई ' शरणपूर रोड, नासिक २.
(दूरध्वनी : ७३०९२) या पत्त्यावर संपर्क साधावा.

प्रकाशक :
श्याम दयार्णव कोपर्डेकर
' इंद्रायणी साहित्य '
२७३ शनिवार पेठ, पुणे ३०.

मुद्रक :
अजित शशिकान्त देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे - ३०

प्रिय मित्र

कै. डॉ. रघुनाथ भडभडे

यांच्या स्मृतीस—

अ. क्र. २०५८० दि. २।११।६८
वि. आरव

# अंक पहिला

[ नटश्रेष्ठ शामकांतच्या निवासस्थानातील एक दिवाणखाना. दिवाणखान्यात थाटामाटाच्या मूल्यवान वस्तूंची रेलचेल उडाली असली तरी वापरणाऱ्या मालकाच्या गलथान बेफिकिरीमुळे या दालनाला धर्मशाळेचीच अवकळा आलेली आहे. त्यावरून धन्याच्या श्रीमंतीची, रंगेल रसिकतेची आणि उधळपट्टीची कल्पना यावी.

डोळ्यात सहज भरण्यासारखी गोष्ट म्हणजे या दिवाणखान्यात 'जेथल्या वस्तू' 'तेथेच' पडल्या आहेत. आदल्या रात्री एका कोचावर भिरकावलेली फ्लॅनेलची पँट तशीच लोंबकळत पडली आहे. वॉर्डरोबच्या अर्धवट उघड्या दारातून वापरलेल्या कपड्यांचे बोळे परीटघडीच्या कपड्यांवर स्वार झालेले स्पष्ट दिसतात. आरामखुर्चीसमोर बूट पडले आहेत तर टीपॉयवर पायमोजांचे बोळे ठाण मांडून आहेत. सिगरेटची भिरकावलेली थोटके जागच्या जागीच बिचारी विझून गेली आहेत. टेबलावर हरतऱ्हेच्या वस्तू गजबजून एक अजबखानाच निर्माण झाला आहे. पुस्तकांची वेडीवाकडी रास, वर्तमानपत्रे, दाढीचे न धुतलेले साहित्य, बंद पडलेले टाइमपीस, चहाचे कप, अशा किती नि काय काय वस्तू म्हणून सांगाव्या ? त्यावरूनच कल्पना येते की या घरात बहुधा गृहिणीचा हात फिरत नसावा.

पण एवढ्यानेच संपलेले नाही. या दिवाणखान्यात आदल्या रात्री काही कमीजास्त विपरीत 'प्रकार' घडला असावा. कोलमडून पडलेले एक स्टूल, फेकलेली पुस्तके, आणि फुटलेला बिलोरी आरसा त्याची साक्ष देतात. सोफासेटजवळच एक उंची मद्याची बाटली रिकामी होऊन सपशेल कलंडलेली दिसते. समोरच्या कोचावर— बहुधा आशुकमाशुकांच्या झोंबाझोंबीत गळून पडलेली टपोऱ्या शेवंतीच्या फुलांची वेणी— आता कोमेजलेली दिसते आहे.

सकाळचे दहा वाजले असावेत. बंद खिडकीच्या तावदानातून ढोपरभर उन्हे वर आली असली तरी अजून या घरात काही सूर्योदय झालेला दिसत नाही. दारावरची घंटी खणखणते. पण घरातल्या शांततेला ढळ पोचत नाही. पुन्हा एकदा घंटी. त्यावर प्रत्युत्तर म्हणून झोपेत बरळल्यासारखे शामकांतांचे

शब्द येतात... "नॉन्सेन्स... टु हेल ! टु हेल !... स्टॉप इट ! स्टॉप इट !... शरम नाही वाटत दुसऱ्याची झोप डिस्टर्ब करायला...?..."

मग कण्हलेल्या स्वरात... "आई गऽ... आई..." मग पुन्हा सर्वत्र सामसूम.

मग बाहेरचे दार उघडून हळूच धर्मा आत प्रवेशतो. धर्माचे वय साठीच्या आतबाहेर. सूरत कोणत्याही घरात वर्षानुवर्षे राबणाऱ्या प्रेमळ गड्यासारखी. या घरात पगारी नोकरापेक्षा त्याचे आता काही एक स्वतंत्र वेगळे स्थान निर्माण झाले आहे हे त्याच्या बोलण्याचालण्यातूनही स्पष्ट होते. धर्मा आत येतो आणि परत वळून दाराकडे 'रात्रभर दार उघडंच ?' अशा प्रश्नार्थक दृष्टीने पाहतो. मग एकदा आत नजर टाकतो. नेहमीच्या कामासाठी तो आत वळणार तोच दिवाणखान्यातली पडझड आणि फोडाफोड त्याला दिसते. चकित होऊनच तो सभोवताली बघू लागतो. हळूहळू त्याला अंदाज येऊ लागतो. पडलेले स्टूल उभे करता करता त्याला दारूची बाटली दिसते. रिकामी बाटली उचलून मान हलवीत साभिप्राय दृष्टीने तो पुन्हा एकदा आत पाहतो आणि चुकचुकत बाटली जागच्या जागी ठेवतो. तेवढ्यात कोचावरली शेवंतीची वेणी त्याला दिसते. त्या क्षणी भडकूनच जवळ जाऊन तो वेणी उचलतो. 'पण या भडकण्याचा काय उपयोग ?' अशा हताश मुद्रेने तो ती वेणीदेखील परत तिथेच टाकतो.

पुन्हा एकदा धर्मा खोलीतले आसमंत हताश मुद्रेने न्याहाळतो. हा पसारा आवरण्याला आता कोठून कशी सुरुवात करावी याचा क्षणभर तो अंदाज घेतो. तेवढ्यात टेबलाजवळ विखुरलेल्या आरशाच्या काचा त्याचे लक्ष वेधतात. चुकचुकत एक वर्तमानपत्राचा कागद घेऊन त्यात मोठे मोठे काचांचे तुकडे भरून त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी तो दार उघडून बाहेर जातो. त्याची पाठ वळते न वळते तोच टेलिफोनची घंटा खणखणू लागते.

मग मघाप्रमाणेच शामकांतांचे अर्धवट झोपेतले बरळणे... "टु हेल ! टु हेल ! आई ग... पुरे पुरे रे तुझं ट्रंग...ट्रंग... घटकाभर तरी झोपू द्याल की नाही..." तरी टेलिफोनची घंटा चाललीच आहे.

मग जागे होऊन शामकांत ओरडतात– "धर्मा, अरे धर्मा– बघ बाबा कोणाला माझी तहान लागली आहे ती ?"

तरीदेखील कोणी येत नाही की कसले प्रत्युत्तर नाही. मग मात्र चरफडत, शिव्या पुटपुटत, डोळे चोळीत, अंगातल्या नाइटसूटवर गाउन चढवीत शामकांत बाहेर येतात. अजून चालताना झुकांड्या जात आहेत. कदाचित झोपेचा वा आणखी कशाचा अंमल ओसरला नसावा.

शामकांतांचे वय चाळिशीच्या जवळपास असावे. तरी पण विशीतला

गुलजारपणा अजून मावळलेला नाही. मुद्रा तेजस्वी आणि हसरी. पण व्यसनानं ओढलेली आणि वैफल्याने खचलेली. साऱ्या बोलण्याचालण्यातही वृत्तीतला उमदेपणा आणि रंगेलपणा भरभरून वहावा. पण तोही उद्ध्वस्त संसाराच्या करुण कहाणीने डागळलेला ! ]

**शामकांत :** ( प्रवेशात चिडून ) ट्रुंग ट्रुंग ट्रुंग... काय टेलिफोन आहे की सोंग ? आगीच्या बंबाची घंटादेखील परवडली या गजरापुढं. ( फोन घेण्यासाठी जाऊ लागतात. तेवढ्यात एका काचेच्या तुकड्यावर पाय पडून काच पायात घुसते. एकदम ' आई ग ऽ ' असे विव्हळत ते खाली बसतात. पायातली काच काढीत चरफडत–) धर्मा, ए धर्मा –कोठे गेलाय हा गद्धा कोण जाणे ! हज्जार वेळा सांगितलं की– (तेवढ्यात फुटलेला आरसा दृष्टीला पडून– ) ओ गॉड ! हा आरसा केव्हा फुटला ? जीव नकोसा केलाय घुशींनी ! ( टेलिफोनचा रिसीव्हर उचलीत ) हॅलो– कोण लालजी ? नमस्ते. आं– होय होय, मी शामकांतच बोलतोय. ऊं ? नाही नाही... लताबाई इथं नाहीत. नाही– काल रात्री होत्या इथं पण...केव्हा गेल्या ते कसं सांगणार ? आमची सगळ्यांचीच विमानं होती वर, तेव्हा... ते ठीक आहे पण आत्ता काही ती इथं नाही...हूं...हूं...हूं... (हुंकारातही पारा चढू लागतो.) आलं लक्षात...समजलं... ऊं हूं... त्यांचा काहीएक अपराध नाही त्यामध्ये. मी सांगतो ना, पंडितरावांचं काही एक चुकलं नाही. मीच त्यांना कळविलं होतं की आजचं शूटिंग रद्द करा म्हणून...हूं...हूं...हूं...झालं ? संपलं ? तुमचं बोलणं संपलं ना ? आता मी काय सांगतो ते ऐका... नाही त्या गप्पा पुरे झाल्या... तुमचं नुकसान किती झालं त्याची रक्कम सांगा... हजार ? ऊं ? दीड हजार ? ठीक आहे– पंडितरावांना सांगा की तेवढी रक्कम कापून घेऊन मला सोमवारी चेक पाठवा... नाही, क्षमा मागायची काही गरज नाही... मी आलो नाही म्हणून तुमचं शूटिंग झालं नाही ना ? हे तर खरं ना ? चूक माझी आहे, त्याचं प्रायश्चित्त... मग झालं तर ! देअर एण्डस् दि होल मॅटर ! ( रिसीव्हर आपटून फोन बंद करतात. दरम्यान धर्मा परत येऊन उरलेल्या काचा कागदामध्ये गोळा करू लागला आहे. धन्याची दखल न घेता, पण त्यांचे बोलणे मात्र घुश्श्यातच साक्षेपाने ऐकत. ) घुशी माजल्या आहेत घुशी ! धर्मा– ए धर्मा– तुला हाक मारतोय मी धर्मा ?

**धर्मा :** ( न बघता आपलं काम चालू ठेवीत ) ऐकतूया मी !

**शामकांत :** या दिवाणखान्यातला हा प्रकार बघितलास का ?

**धर्मा :** काई नवीन न्हाइती परकार ह्ये ह्या दिवानखान्याला !

**शामकांत :** पण तुला होतोय कुठं वेळ ? परवापासन शंभर वेळा सांगितलं असेल की घुशीचा सापळा घेऊन ये म्हणून. पाहा बरं. हा केवढा आरसा फोडून ठेवलाय तो आज ?

**धर्मा :** सापळ्याचा काय बी उपयोग न्हाई साब !
**शामकांत :** सापळ्याचा उपयोग नाही ? म्हणजे ?
**धर्मा :** ह्या घुशी कुठं साफळ्यामंदी गवसतात व्हय ?
**शामकांत :** ( गोंधळून ) म्हणजे ?
**धर्मा :** सापळ्यामंदी मानसास्नी पकडनाऱ्या घुशीचं काम हाय ये !
**शामकांत :** मी नाही समजलो तुझ्या बोलण्याचा अर्थ !

[ धर्मा मुकाट्याने न बोलता कोचावरली वेणी उचलून दाखवितो.]

**शामकांत :** ( दचकून ओरडून ) धर्मा—
**शामकांत :** ( दचकून ओरडून ) धर्मा—

[ धर्मा वेणी खाली टाकून मुकाट्याने पाठ वळवून काचा भरलेला कागद घेऊन बाहेर जातो. शामकांत डोळे विस्फारून सभोवताली पाहू लागतात. काल रात्री घडलेल्या प्रकाराचा त्यांना हळू हळू उमज येऊ लागतो. खिशातून सिगरेट केस काढून त्यातून विमनस्कपणे सिगरेट काढून शिलगावतात. तेवढ्यात धर्मा पुन्हा येतो आणि न बोलता दिवाणखान्यातली आवराआवर करू लागतो. त्याचा घुस्सा शामकांताच्या आता लक्षात येतो. ]

**शामकांत :** ( धर्माजवळ जाऊन मृदू स्वरात ) धर्मा– ए धर्मा... ( धर्मा पाठ वळवतो. पण शामकांत त्याचे खांदे धरून त्याला आपल्याकडे वळवीत— ) धर्मा— माझ्यावर रागावलास ? तूसुद्धा माझ्यावर रागावलास ?
**धर्मा :** रागाऊ नगं तर काय करू धनी ? पोटच्या लेकरापरीस मायेनं माज्या अंगाखांद्यावर वाढवलं मी तुम्हाला; माज्या पांढऱ्या केसांना ह्यो ह्यो असला संसार दावण्यापायी का हितं आणलंत ? ( रागाने थरथरत ) पोटच्या पोरानं असलं थेर केले असत्ये तर– ( रागाने फक्त पाठ वळवतो. )
**शामकांत :** ( पुन्हा त्याच्या समोर येऊन त्याचे खांदे धरीत ) थांबू नकोस असा. तर काय केलं असतंस ? मला माहीत आहे तू काय केलं असतंस ते ( त्याच्यापुढे तोंड करीत ) हूं. भडकाव माझ्या मुस्काटात ! तुझा राग तरी शांत होऊ दे. हूं– भडकाव ना ?
**धर्मा :** साब, मी नोकर हाय तुमच्या घरामंदी !
**शामकांत :** घर ? कोठलं घर ? ( विषण्णतेने हसून ) वेड्या, या धर्मशाळेला का तू घर म्हणतोस ? धर्मा, घराच्या घरपणाची कळा कोठे दिसतेय का तुला ?
**धर्मा :** कुनी गमावली ही कळा ?
**शामकांत :** तेच मी तुला विचारतोय !
**धर्मा :** असले तिढे सवाल मला कशापाई पुसता ?
**शामकांत :** तुला नको विचारू तर कोणाला विचारू ? माझं कोण उरलंय आता ? ( हसून ) धर्मा, खरंच तू माझ्यावर एकदा सणसणून रागाव रे. नुसता कोरडा राग

नाही बरं का— ? पूर्वी मी लहान होतो तेव्हा— जरा द्वाडपणा केला की दोन फटके द्यायलादेखील तू कमी करीत नव्हतास. आ— आठवतंय ना ?

**धर्मा :** मग त्ये त्ये आता पुना चालू करू म्हणता की काय ?

**शामकांत :** धर्मा, तूसुद्धा माझ्यावरली आपली माया पातळ केलीस.

**धर्मा :** कोन म्हनलं मी बदललो म्हणून ? माया पातळ केली असती तर भरलं घर सोडून तुमच्यामागं हितं हा वनवास भोगाया आलू असतो मी ?

[ शामकांत निरुत्तर होतात. मनातला क्षोभ दडविण्यासाठी पाठ वळवून तेथील टेबलावरील पुस्तके आवरू लागतात. धर्मा त्यांच्याजवळ जातो आणि— ]

**धर्मा :** ( मायाळूपणे ) शामबाबू—

[ ही परिचित प्रेमळ हाक इतक्या वेळाने कानावर पडताच शामकांत वळून बघतात आणि प्रसन्नपणे हसतात. ]

**धर्मा :** किती दिवस चालायचं हे असं ?

**शामकांत :** काय ?

**धर्मा :** ह्यो वनवास ?

**शामकांत :** वनवास कसला आलाय हा ? काय कमी आहे तुला मला इथं ?

**धर्मा :** त्ये आपुन आपल्या मनालाच इचारा की ! हितं काय बी कमी नाय तर जीव का सारखा तरफडतो ? घरात सोन्यासारखी बायकू हाय, दिष्ट लागन्यावानी दोन चिमनी बाळं हायेती. गोकुळासारका भरला संवसार सोडून हितं येऊन हे कसलं अमंगळ जिणं चालवलंय हाय आपुन ?

**शामकांत :** मी राजीखुषीनं का पत्करलाय हा वनवास ? धर्मा, मी आपण होऊन तर घर सोडलं नव्हतं ? अरे तुझ्या सीतेनंच जर या रामाला घराबाहेर काढून वनवासाचा मार्ग दाखवला तर—

**धर्मा :** खरंच— बाई सीतादेवीवानी पातिवरता हायेती. आपुन मातुर... ( रागाने धुमसत ) आपुन पुना रामाचं नाव बी घेऊ नगा शामबाबू. ( काम करू लागत धुमसत धुसफुसत ) तुम्हांला घराभाईर जा म्हणून सांगायची काई हौस हुती व्हय बाईसाहेबान्ला ? बिचारी कष्ट करून दोन पोरांना घेऊन नेकीनं राहिली हाय गरिबीत, आपुनच बाईच्या मागं ह्यो वनवास लावला शामबाबू.

**शामकांत :** मी ? काय म्हणतोस काय तू धर्मा ? अरे मी दिलेले पैसेसुद्धा तिनं घेतले नाहीत !

**धर्मा :** आपुनच ताळतंतर सोडलात. पोराबाळांच्या म्होरं नगं नगं ती थेरं केलीत. तुमच्यापायी याच गावात येका घराची दोन घर जाली. कोनती मानी मनाची बाईल दोन येळच्या घासासाटी तुमच्या म्होरं पदर पसरील ?

**शामकांत :** ( विव्हलतेने ) नको, नको, धर्मा— जाऊ दे ! त्या आठवणी काढून पुन्हा मला भाजू नकोस. जित्याच्या खोडी आहेत या. माझ्याबरोबरच त्या आता

संपायच्या.

**धर्मा :** ( क्षणार्धाने ) शामबाबू– किती येळा आपुन वचनं दिल्याती की ह्ये घरात असलं परकार पुना करनार न्हाई म्हणून ?

**शामकांत :** ( विषण्णतेने हसून ) भोळा आहेस तू धर्मा. खरी समजलास की काय तू ती वचनं ? अरे बायकोला दिलेलं एकही वचन ज्यानं उभ्या आयुष्यात कधी पाळलं नाही, तो कोणाच्या शब्दाचा कधी मान ठेवील का ?

**धर्मा :** खरंच– शामबाबू, आपुन ह्या सिनेमाच्या धंद्यात पडायाच नको हुतं. देवानं बाकीचं गुण तुम्हाला काय कमी दिल्यात म्हणून—

**शामकांत :** आज तुलाच नव्हे, तिलाही तसंच वाटतं. पण मी सिनेमात जावं असा त्या वेळी तिचाच हट्ट होता. त्या वेळी तिनंच माझ्यातल्या कलावंताचे नको नको ते लाड केले.

**धर्मा :** ( खोचून ) यसनांचे बी ?

**शामकांत :** व्यसनाचे कोणी लाड करावे लागत नाहीत धर्मा. झाडावर कीड पडावी तशी दुबळ्या मनाला व्यसनं आपोआप येऊन चिकटतात.

**धर्मा :** शामबाबू, एक इचारू ? बाई आवडत न्हाइत तुम्हाला ?

**शामकांत :** ( मोठ्याने हसून ) कशावरून तर्क केलास तू वेड्या ? अरे कॉलेजमध्ये असताना आमचा प्रेमविवाह होता, हे ठाऊक नाही का तुला ?

**धर्मा :** ( कोचावरील वेणी उचलीत ) मग ह्येचा अर्थ काय ?

**शामकांत :** ( एकदम गंभीर होत ) टाक ती वेणी खाली. माझ्या पापानं तू आपले हात विटाळू नकोस :

**धर्मा :** आपुन समदं शरीर इटाळलंत मंग माझ्या हातांची गोष्ट काय ?

**शामकांत :** धर्मा, माझा नाद सोडून दे. माझ्या सबंध आयुष्याचेच हिशेब चुकले आहेत.

[ असे उद्गारत शामबाबू पाठ वळवतात. खिडकी उघडून बाहेर रस्त्यावर बघू लागतात. जणू बाहेरील प्रसन्नता घरात प्रवेशावी तशी कसल्याशा एका नव्या विचाराने शामकांताची मुद्रा प्रसन्न होते. खिडकीतून बाहेर बघत असतानाच... ]

**शामकांत :** ( प्रसन्नपणे ) धर्मा—

**धर्मा :** जी ?

**शामकांत :** आज शनिवार, नाही रे ?—

**धर्मा :** जी हां धनी.

**शामकांत :** आज जाईची सकाळची शाळा ?

**धर्मा :** हूं.

**शामकांत :** ( अधीरतेने ) आपल्या बंगल्यावरून शाळेला जाताना पाहिलीस तू तिला ?

**धर्मा** : न्हाई जी.

**शामकांत** : मीसुद्धा नाही पाहिली रे तिला. उशिरा उठलो नाही का मी आज?

**धर्मा** : हूं.

**शामकांत** : तू मला लवकर का नाही उठवलंस आज?

**धर्मा** : काल रातचं जागरन आन—

**शामकांत** हो, तेही खरंच! (उल्हसितपणे) फार फार बंड झालीय नाही रे पोरगी?

**धर्मा** : त्ये काय इचारता!

**शामकांत** : अरे नकला काय करते, गाणी काय म्हणते, नाटकातली भाषणं काय म्हणते, नाच काय करते, आळीतली पोरं जमवून दंगा करून घर डोक्यावर घेते नुसतं.

[असे म्हणत शामकांत खळखळून हसतात.]

**धर्मा** : घर? (खोचून) घर कुटलं?

**शामकांत** : (वरमून) आपलं नाही रे—तिचं घर म्हणतोय मी. म्हणजे ते भगवंतराव सांगत होते सहज एकदा मला. मी नव्हतो गेलो बघायला.

**धर्मा** : असं! असं!

**शामकांत** : धर्मा—

**धर्मा** : जी धनी!

**शामकांत** : (अति उत्साहाने) चार दिवस जाईला आणि प्रसादला राहायला बोलावू या का आपल्या घरी?

**धर्मा** : (डोळे विस्फारीत) हितं? राहायला?

**शामकांत** : का? त्याला काय झालं?

**धर्मा** : त्ये न्हाय जमायचं!

**शामकांत** : न जमायला काय झालं? खरं म्हटलं तर कायद्यानं मुलांचा ताबा घेऊन मला त्यांना इथं आणून ठेवता येईल. पण मला तसलं काही करायचं नाही.

**धर्मा** : असला येडा इचार मनात बी आनू नगा—

**शामकांत** : तू म्हणजे बुवा फारच... (जवळ जाऊन रागाने त्याचे खांदे धरून त्याला गदगदा हलवीत). आम्हाला मुलांना भेटावंसं वाटत नाही काय रे? सांग? मुलांच्यावर माया करायचा मक्ता काय एकट्या त्यांच्या आईला दिंलाय? बोल, बोल अगोदर. माझा काहीच हक्क नाही मुलांच्यावर? सांग? सांग?

**धर्मा** : (स्वतःला सोडवून घेत) व्हय! व्हय! व्हय! मी न्हाई कधी म्हनलं शामबाबू?

**शामकांत** : मग जाईला आणि प्रसादला आणायचं इथं. फार नाही— फक्त चार दिवस, ठरलं तर? होय म्हण! म्हण होय! (धर्माच्या कमरेला विळखा घालून त्याला उचलून दिवाणखान्यात नाचवीत) म्हण होय. म्हणतोस की नाही?

**धर्मा** : व्हय...व्हय...व्हय (शामकांत त्याला सोडतात.) पर बाईंची परवानगी?

**शामकांत :** ( अजीजीने ) ती मात्र तू काढायचीस हं. तू शब्द टाकलास तर ती काही नको म्हणायची नाही. धर्मा– ए प्लीज... माझ्याकरता—

**धर्मा :** नगं रे बाबा– हितं रोज ह्ये परकार चालायचे आन्—

**शामकांत :** मी तुला वचन देतो धर्मा—

**धर्मा :** भोळा हाय मी धनी. मला कशापाई लबाड वचनं देता आपुन ?

**शामकांत :** खरंच रे– अगदी जाईच्या गळ्याशपथ सांगतो तुला—

**धर्मा :** ( दाराकडे लक्ष जाऊन ) संबर वर्सं आयुक्शं हाय छोट्या बाईसायबास्नी !

[जाई– आठ नऊ वर्षांची एक चुणचुणीत मुलगी दारात येऊन उभी राहते, तिच्या गळ्यात दप्तर आहे आणि हातात डबा आहे. त्यावरून शाळेतून या बाई-साहेब परस्पर आलेल्या दिसताहेत. शामकांतांना पाहताच जाई उचंबळून "बाबा मी आले...बाबा मी आले..." असे ओरडत त्यांच्याकडे धाव घेते. तर शामकांत तिला पाहताच हातातली सिगरेट दूर भिरकावीत..." जाई तू ? तू आलीस ? माझ्या घरी आलीस ? " असे ओरडत अत्यानंदाने धावत जाऊन तिला उचलून घेतात, व तिला कवटाळून दिवाणखान्यात हर्षभराने अक्षरशः थयथया नाचतात. नाचण्याच्या भरात तिला ते स्वतःच्या डोक्यावर बसवतात. तिला आपले हाल सहन न होऊन धिंगामस्ती करीत ती ओरडू मात्र लागते– " सोडा, सोडा– असं हो काय बाबा, सोडा ना मला खाली... शामकांत खोट्या दटावणीने तिला म्हणू लागतात... " नाही, नाही सोडणार ! आमच्या घरी का आलीस बोल ? कशी सापडलीस– आं ? " तेवढ्यात मस्ती करून जाई निसटते आणि दिवाणखान्यात त्यांची पाठशिवणी सुरू होते. प्रथम सोफा सेट भोवती. त्या धावपळीत धर्माचेही हाल सुरू होतात. तशी तो– " शामबाबू...शामबाबू...ताई...ताई... " असे ओरडू लागतो. तर शामकांत रंगात आले असल्याने त्यालाच दटावतात– " थांब रे तू ! या पोरटीला मला पकडू दे...अरेच्या– थांब थांब, पकडतोच हं तुला..." जाई शामकांतांना वेडावून दाखवून म्हणू लागते– " ॲहॅ... ॲहॅ... पकडा, पकडा पाहू...पळता तरी येतंय का ? बाबा लंगडे...बाबा लंगडे..." अखेर ती दमते आणि त्यांच्या हाती सापडते. ]

**शामकांत :** सापडली ! सापडलीस की नाही ? आं ? पळून जात होतीस नाही का ?

**जाई :** हे हो काय बाबा ? माझे केस विस्कटले ना सगळे !

**शामकांत :** विस्कटू दे. आमच्या घरी का आलीस ते सांग आधी.

**जाई :** तुमचं घर ? हे हे तुमचं घर ? ठेवलंय तुमचं घर !

**शामकांत :** माझं नाही तर कोणाचं घर आहे हे ?

**जाई :** सांगू ? हे घर आहे माझ्या बाबांचं ! कशी झाली एका माणसाची फ– बाबांची हुर्यो ! ( हसत टाळ्या पिटू लागते. )

**शामकांत :** थांब हो लबाडे —
**धर्मा :** ( वडिलकीने डोळे वटारीत ) ताई... ताई...
**शामकांत :** ए बाबा– तू का जेव्हा तेव्हा तिच्या आईसारखा डोळे गरकावीत आमच्या राशीला लागतोस ? जरा आम्हाला मोकळेपणानं खेळू दे तरी ! बस ग जाई. तू बघूच नकोस मुळी.
**जाई :** आज आपण खूप खूप मज्जा करायची हं बाबा !
**शामकांत :** अगदी मज्जाच मज्जा ! पुष्कळ पुष्कळ गप्पा मारायच्या आपण !
**जाई :** ( उठून समोरच्या एका कोचावर शिष्टपणे बसत ) बाबा, मला गोष्ट सांगाल ?
**शामकांत :** हो हो, गोष्टीला काय तोटा ?
**जाई :** अँड्रोक्लीसची ?
**शामकांत :** परवासारखं अँड्रोक्लीसचं आपण नाटक करू या का ?
**जाई :** हां हां–आपण नाटकच करू या. पण बाबा–तुम्ही अँड्रोक्लीस आणि मी सिंह. ( सिंहासारखा आवाज काढते. )
**शामकांत :** तसं नको– तू हो अँड्रोक्लीस आणि मी सिंह. ( सिंहासारखा आवाज काढतात. )
**जाई :** नाही नाही–मी सिंह होणार. आम्हाला आहे ठाऊक. आपण सिंह व्हायचं आणि आम्हाला भीती दाखवायची. होय की नाही ?
**शामकांत :** अग पण–
**धर्मा :** शामबाबू, ताईंना काई च्या-कापी इचारायची न्हाई का ?
**शामकांत :** अरे खरंच की ! मी विसरलोच बघ ! मग जाई, तू चहा घेणार की–
**जाई :** आऽ ? चहाऽऽ ? आईने दिलेला मार विसरलात वाटतं ?
**शामकांत :** मार ! आईने दिला ! मला कधी मार दिला तुझ्या आईनं ?
**जाई :** तुम्हाला नाही हो. मला ! मला नाही का मार दिला ? मागं, मागं ? ते नाही का– मावशीच्या घरी मी चुकून चहा प्यायले तर आईनं मात्र मला मुद्दाम मार दिला– ते हो ?
**शामकांत :** ( मिस्किलपणे ) हां हां, ते मागचं होय ? आठवलं ! आठवलं ! म्हणजे तू अगदी चुकून चहा प्यायलीस, आणि आईनं मात्र तुला मुद्दाम मार दिला–तेच ना ? आठवलं बरं का. अग तुलाच काय, मलासुद्धा तुझी आई मार देईल मी तुला चहा दिला तर– ठाऊक आहे ? मग काय, कोको घेशील ?
**जाई :** ( हळूच ) नुसताच कोको ?
**शामकांत :** मग आणखी काय काय हवंय ते बोल ना ? बिस्किटं, केक्स, सामोसे, सँडविचेस—
**जाई :** ( प्रत्येकाला मान डोलावीत ) झालंच तर लिमलेट, चॉकलेट– कॅडबरीचं हं.
**शामकांत :** धर्मा– जे जे मिळेल ते घेऊन ये आमच्या राणीसाठी. जा, जा लवकर–

**धर्मा :** हये हये समदं आनायचं ?

**शामकांत :** तू जा म्हणतो ना (उठून त्याला बळेबळे ढकलीत) समोरच्या त्या इराण्यासकट त्याचं हॉटेल खरेदी करून आणलंस आज तरी हरकत नाही. जा जा !

(धर्मा जातो.)

**जाई :** पण बाबा—

**शामकांत :** काय ग ?

**जाई :** मी मागितलं नाही हं काही ? तुम्ही आपण होऊन दिलंय आम्हाला सगळं काही.

**शामकांत :** का ग ? मागितलं की आई मार देते ना ?

**जाई :** पण आम्ही मुळी मागतच नाही. अहो आपला प्रसाद आहे ना, तोच मागतो लोकांच्या घरी.

**शामकांत :** लोकांच्या घरी ? वाऽ, मी म्हणजे 'लोक' वाटतं ?

**जाई :** ऊं ? मग तुम्ही कुठं आमच्या घरी राहता ?

**शामकांत :** तुझ्या घरी ? मी ?

**जाई :** मग ? सगळ्यांचे बाबा कसे आपआपल्या घरी राहातात हो ? तुम्ही मात्र अप्पलपोटे आहात. आपण तेवढे एकटे एकटे या छान छान घरात राहाता—

**शामकांत :** अग पण तुझी आई कुठे राहू देते मला तुमच्या घरी ? तुझ्या आईनंच मला दिलंय घालवून, आहे ठाऊक ?

**जाई :** तुम्ही दंगा केला म्हणून की आईला उलट उत्तर केलं म्हणून ?

**शामकांत :** (हसून) तुझ्या आईला नाही का कधी विचारलंस ?

**जाई :** विचारलं की आई रडायलाच लागते बाबा.

[शामकांतांची मुद्रा खर्रकन् पडते. मुद्दाम विषय बदलीत—]

**शामकांत :** पण काय ग– खरं सांगायचं हं– अगदी खरं. तुला आई मार देते की नाही ? खरंऽऽ अगदी खरं सांग हं ?

**जाई :** (लाजत लाजत) कधी कधी मारते.

**शामकांत :** मारते ना ? वाटलंच मला. अगदी हाडाची मास्तरीण आहे, ए– पण मी तुला कधी तरी मारलंय का ?

**जाई :** आंऽऽ ? मागंऽऽ ? आमच्या घरी तुम्ही राहात होता त्या वेळी ? मी विसरले नाही बरं का अजून ?

**शामकांत :** (वरमून) अग हळूच चापटी मारली असेल. त्याला का मार म्हणतात ?

**जाई :** हळूच ? लहानशी चापट ? ऊंऽऽ ! चांगली जोरानं लगावली होतीत की ? आणि वर 'गळा काढू नकोस' म्हणून ओरडून मला चिमटेसुद्धा काढलेत.

**शामकांत :** ए ए, हे मात्र खरं नाही हं. तुझ्या आईसारखे धबाधबा दणके तर घातले नाहीत ना मी तुला कधी ?

**जाई :** (सभोवताली बघत) बाबा, तुमची आई तुम्हाला मारीत नव्हती का हो कधी ?
**शामकांत :** (बावचळून) माझी आई ? मला ? मारीत ? का ग ?
**जाई :** सामान कसं वेडंवाकडं टाकलंय ते बघा ना. नुसता बाजार मांडलाय या दिवाणखान्यात ! माझं नुसतं दप्तर खुंटाळ्याला ठेवलं नाही तर आई लागलीच रपाटा घालते माझ्या पाठीत– आहे ठाऊक ?
**शामकांत :** काय काय बुवा वेडंवाकडं पडलं ?
**जाई :** (शिष्टपणाने) ही तुमची विजार– इथं का टाकायची ? (उठून घडी घालू लागते.)
**शामकांत :** (तिच्या हातून पँट काढून घेत) चुकलं बुवा आमचं.
**जाई :** (पळत जाऊन बूट उचलीत) हे बूट–इथं घरात घालून कोण आलं हो ?
**शामकांत :** (हसत) मीच ! दुसरं कोण ?
**जाई :** आणि हे टेबल पाहिलंत का एकदा बाबा ?
**शामकांत :** का ? काय झालं बाई ?
**जाई :** चहाचा कप आपला आपण धुवून टाकायचा नाही ? शी– दाढीचा ब्रशदेखील धुतला नाहीत. आणि ही पुस्तकं—
**शामकांत :** (हसत आवराआवर करीत) आईचा एवढा गुण मात्र छान उचलला आहेस.
**जाई :** ते काही नाही. बाबा, इकडं या पाहू. (दरडावीत) आधी इकडे या.
**शामकांत :** आता आणखी काय हुकूम आहे बाईसाहेब ?
**जाई :** (कमरेवर हात ठेवून ठसक्यात) आंगठे धरून उभे रहा.
**शामकांत :** आँऽऽऽ ?
**जाई :** आं– काय ? धरा आंगठे अगोदर ! त्या त्या वेळी–आम्हाला कसं ? आम्हाला कसे आंगठे धरायला लावत होतां ? आं ? धरा– अगोदर. (शामकांतांना धरून बळे बळे वाकवून आंगठे धरायला लावते. "अग पण...बरं बुवा...ए आता पुरे ना...चुकलो !" असे शामकांत म्हणू लागतात तेव्हा–) हं पुरे, सोडा आता आंगठे. पुन्हा नाही हं असं करायचं.
**शामकांत :** (वेडावून दाखवीत) समजलं बरं मावशीबाई !

[तेवढ्यात जाईचे लक्ष रिकाम्या कलंडलेल्या दारूच्या बाटलीकडे जाते. एकदम तिच्या मनात उत्कंठा जागी होऊन—]

**जाई :** ही कसली बाटली बाबा ? छान आहे की—
**शामकांत :** (विद्युत्‌वेगाने बाटलीवर झडप घालून आपल्या पाठीमागे ती लपवीत) काही नाही ग...काही नाही...आपलं ते हे...म्हणजे याची बाटली आहे ग...
**जाई :** सरबताची का ?
**शामकांत :** हो हो, सरबताचीच.

**जाई :** बघू बघू मला—( त्यांच्याशी झोंबू लागते. शामकांताची तारांबळ उडते. )
**शामकांत :** नाही ग— सरबताची नाही. आपलं ते हे— औषध आहे औषध—छा छा छा— कडूझेर औषध...
**जाई :** कडूझेर औषध ? मग बघू देच मला...बघू दे की....
**शामकांत :** अग अग—–रिकामी आहे ती बाटली.
**जाई :** मग मला द्या. ( अखेर बाटली हिसकावून घेतेच ) छान आहे बाटली. रोज शाळेत घेऊन जाईन मी ही बाटली.
**शामकांत :** शाळेत ? ही ही बाटली ?
**जाई :** अहो प्यायचं पाणी न्यायला. बाबा, तुमच्यापाशी पुष्कळ आहेत का हो असल्या बाटल्या ? आणखी एक आमच्या कुंदासाठी द्याल ?
**शामकांत :** फार शहाणी आहेस तू !
**जाई :** ( तेवढ्यात बूच काढून वास घेत ) शी ऽऽ ! आयडीनसारखा वास येतोय—– शी ऽ !
**शामकांत :** मग सांगतोय काय मी तुला ? आण पाहू ती बाटली इकडं.
**जाई :** ( बाटली परत देत ) बाबा, रोज तुम्ही आयडीन पिता ?
**शामकांत :** आं ? आयोडिन ? अग आयोडिन नव्हे—– औषध, औषध होतं ते. [शामकांत बाटली दूर कोठे खबरदारीने ठेवतात. तेवढ्यात धर्मा भला मोठा ट्रे घेऊन प्रवेशतो. ट्रेमध्ये कोकोच्या कपाच्या जोडीला बिस्किटे, सामोसे, सँडविचेस, केक्स, चॉकोलेट, लिमलेट इत्यादी वस्तू हारीने मांडल्या आहेत. त्याला पाहताच—–] हा बघ तुझा कोको आणि तुझा खाऊ आला.
**जाई :** ( खूष होत ) इतका ? सगळा माझ्यासाठी ?
**शामकांत :** नाही तर दुसरं कोण आहे इथं ?
**जाई :** पण सगळा आत्ताच खायचा ?
**शामकांत :** मग खिशात घालून घरी नेणार आहेस ?
**जाई :** वा—–आपल्या प्रसादला नको का न्यायला ?
**शामकांत :** बरं बरं, घेऊन जा घरी. घाल रे पुडे तिच्या दप्तरात. कोको आणि हे सामोसे तरी इथेच खाणार आहेस ना ? की तेही दप्तरात घालायचे ?
**जाई :** बाबा, बाबा, पण मी आपल्या हातानं खाणार हं !
**शामकांत :** अगदी आपला हात नि जगन्नाथ—–होऊन जाऊ दे !
**धर्मा :** थांबा ताई—–मी कोको बशीत वतून देतू—–मंजी अंगावर सांडायचा न्हाय— [ धर्मा तिच्या शेजारी जमिनीवर उकिडवा बसून तिला बशीतून कोको ओतून देतो. ]
**जाई :** ( फुरके मारून कोको पीत ) बाबा—– मोठी माणसं कधी गटारात लोळतात का हो ?

**शामकांत :** ( चमकून ) मोठी माणसं ? गटारात ? का ग ?
**जाई :** काही नाही. आपलं उगीच !
**शामकांत :** उगीच ? उगीच नाही विचारायचीस तू ?
**जाई :** ( हसत ) आम्हाला आहे माहीत तुमची मज्जा !
**शामकांत :** मज्जा ? कसली मज्जा ? कोणी सांगितली तुला ही मज्जा ?
**जाई :** सांगितली नाही काही ऽ— आमच्या शेजारचे भगवंतकाका त्या राघूच्या मावशींना सांगत होते ते मी ऐकलं.
**शामकांत :** काय काय सांगत होते ?
**जाई :** ते सांगत होते की जाईचे बाबा रोज रात्री पितात आणि गटारात लोळतात म्हणून. खरंच का हो ?
**शामकांत :** (चेहरा प्रेक्षणीय होतो. गडबडीने) हद्द ! अग सगळं खोटं ते.
**जाई :** ( पुन्हा कोको पीत ) पण बाबा, पावसाळ्यात खूप पाणी आलं म्हणजे गटारात लोळायला अगदी मज्जा येत असेल, नाही ?
**शामकांत :** ( हसतो ) वेडी रे वेडी. अगं पाणी आलं म्हणून कोणी गटारात लोळतं वाटतं ?
**जाई :** बाबा, आईला देखील कुणी तरी फसवलंय. तिला वाटतंय की तुम्ही गटारातच राहता ?
**शामकांत :** हद्द ! काही तरीच !
**जाई :** काही तरीच नव्हे—परवा एकदा झालं काय—
**धर्मा :** ( मुद्दामच तिला तोडत ) हूं. आता ह्यो भिस्कुटं—
**जाई :** (हसत) भिस्कुटं ? बिस्किटं म्हण की—?
**धर्मा :** त्योच. ह्यो चाकलेट, आन ह्यो काय म्हनत्यात त्यो—
**जाई :** अरे केक्स. ( खाता खाता ) बाबा, या धर्माला शाळेत शुद्धलेखन शिकवलं नाही का हो कोणी ? सारखं ' ह्यो अन् त्यो ' करतो आणि—
**धर्मा :** माज्या ल्हानपणी गावामंदी साळाच नवती ताई— ( कप उचलून ट्रे मध्ये ठेवतो आणि आत जातो. )
**जाई :** खररररंऽच ? मग दिवसभर मज्जाच की ? खूपखूप खेळावं अन्— ( एकदम आठवण होऊन ) अय्या ऽ—माझा डबा—अहो डबा तसाच राहिला की ?
**शामकांत :** राहिला असला तर आण इकडं. मी खाऊन टाकतो तुझा डबा. काय काय आणलं आहेस आज डब्यात—बघू या तरी ?
**जाई :** ( उठून डबा आणीत ) गंमत आणलीय एक. ओळखा बघू ?
**शामकांत :** मग आम्हाला दे की तुझी गंमत ?
**जाई :** आधी नाही. अगोदर ओळखा आमची गंमत.
**शामकांत :** ओळखू ? ओळखू ? बघ हं– (डोळे मिटून नाटकीपणाने–) हा–श्रीखंड.

**जाई** : श्रीखंड ? (हसते.) हट्ट ! आज काय माझा वाढदिवस आहे वाटतं ?
**शामकांत** : थांब, आता अगदी बरोबर सांगतो– पुरणाची पोळी.
**जाई** : नाही ! नाही ! नाही ! रोज कोणी पुरणाची पोळी करतात का ?
**शामकांत** : मग कांद्याची भजी ? आं ऽ ?– ओळखलं की नाही ?
**जाई** : नाही ! नाही ! बोला हरलात का ? सांगू ?
**शामकांत** : हरलो बुवा. हूं– सांग, सांग काय आणलंस डब्यात ?
**जाई** : ( डबा उघडीत ) अहो बाजरीची भाकरी. एवढीसुद्धा ओळखता आली नाही ?
**शामकांत** : आईनं केली ही भाकरी ? आणि वर लोणीसुद्धा दिसतंय ?
**जाई** : मग तोंडी लावायला नको ? लसणीचं तिखटसुद्धा आहे.
**शामकांत** : ( डब्यात पाहात ) लसणीचं तिखट ?... बस बस... ठार मेलो—
**जाई** : तोंडाला अगदी पाणी सुटलंय ना ? आई किती छान करते भाकरी ! होय ना बाबा ?
**शामकांत** : ( मिटक्या मारीत खात ) अग तुझ्या आईच्या हातची भाकरी मी किती तरी दिवसांत खाल्ली नाही. ( खाता खाता– ) काय धर्मराज– नमुना हवाय का ?
**धर्मा** : मला नगं—
**शामकांत** : तुला गड्या याची काय टेस्ट ? देवानं तुझ्या कपाळावर मुळी खानावळीचाच विल्ला ठोकलाय ! [ शामकांत घासागणिक रंगात येतात. एक खातात आणि म्हणतात– ' ओफ ! ' पुन्हा दुसरा घास खातात आणि " वा वा ! " पुन्हा तिसरा घास खातात आणि उजव्या हाताचा अंगठा आणि शेजारचे बोट यांचे वर्तुळ करून प्रशस्तीदाखल नाचवीत म्हणतात– " वा ऽ " मग पुन्हा मोठा तोबरा भरीत– " मार डाला ! अरे यार, बघ बघ– " जाई कौतुकाने बघते आणि प्रत्येक उद्गाराबरोबर खदखदून हसते. डबा संपल्यावर– ] वा जाई वा ! मजा आणलास आज तू. [ जाई पळत पळत उठून दप्तरातली पाण्याची बाटली काढून देते. शामकांत पाणी गटागटा पिऊन मोठा ढेकर देतात– ] वा !
**जाई** : बाबा– रोज तुम्ही जेवता कुठं हो ?
**शामकांत** : कुठे म्हणजे ? खानावळीत.
**जाई** : घरी का नाही जेवीत ?
**शामकांत** : माझ्या घरी स्वयंपाक कोण करणार ?
**जाई** : तुमची ती सटवी स्वयंपाक करीत नाही का ?
**शामकांत** : ( चकित होत ) सटवी ? सटवी ? सटवी कोण ? ( धर्मा खुदकन् हसतो तशी– ) तुला रे दात काढायला काय झालं ? चावट माणूस !
**जाई** : ( निष्पापपणाने हसत ) आं ? आम्हाला माहीत आहे तुमची जम्मत !
**शामकांत** : जम्मत ? कोणी सांगितली तुला ही जम्मत ? भगवंतरावांनी ? की—
**जाई** : नाही काही– अहो आईनं.

**शामकांत** : आईनं ? काय काय सांगितलं तुझ्या आईनं ?

**जाई** : आईला मी एकदा विचारलं– " बाबांना जेवायला करून कोण घालतं ग ? " तर आई कशी म्हणते– " आहे ना ती सटवी ! " कोठे आहे हो बाबा ती सटवी मावशी ?

**शामकांत** : मावशी ? सटवी मावशी ?

**जाई** : मग ? मोठ्या बायकांना मावशी म्हणायचं असतं ! कुठं आहे सांगा ना ?

**शामकांत** : ( शरमिंदेपणा लपवीत ) अगं सटवी कोठली आलीय ? तुझी चेष्टा केली आईनं.

**जाई** : पण बाबा—

**शामकांत** : ( मुद्दामच विषय बदलीत ) बरं मला आधी तू हे सांग—

**जाई** : काय सांगू ?

**शामकांत** : आज, आत्ता तू या वेळी इथं कशी आलीस ?

**जाई** : शाळेत शेवटचा तास होता कवाइतीचा.

**शामकांत** : तो चुकवून आलीस वाटतं ? अग लबाडे—

**जाई** : मग काल तुम्ही पार्कमध्ये का आला नाहीत ?

**शामकांत** : आलो होतो ग मी—

**जाई** : खोटं ! खोटं !

**शामकांत** : खरंच आलो होतो ग मी. पण...पण...तुझी आई होती उभी तिथं म्हणून...

**जाई** : मग आई उभी असली म्हणून काय झालं ?

**शामकांत** : तसं नव्हे... पण...

**जाई** : बाबा, आईनं तुमच्याशी गट्टी फू केलीय का ?

**शामकांत** : होय ग, तुझ्या आईनं माझ्याशी बोलणंच टाकलंय.

**जाई** : हात्तिच्या–मग त्यांत काय मोठ्ठंसं ? मी सांगू का ? देवापुढं जायचं, एक थोबाडीत मारून घ्यायची आणि कान धरून दोन उठाबशा काढायच्या, आणि नाक घासून ' चुकलो ' म्हणायचं–म्हणजे आई पुन्हा बोलायला लागते.

**शामकांत** : ( विषण्णतेने हसून ) तरीदेखील तुझी आई माझ्याशी बोलायची नाही.

**जाई** : मी सांगेन आईला, तू बाबांशी बोल म्हणून.

**शामकांत** : पण आज तू आईला विचारून आलीस का माझ्याकडं ?

**जाई** : ऊं हूं: !

**शामकांत** : आणि आता आईला समजलं म्हणजे ?

**जाई** : ( गोरीमोरी होत ) तुम्ही सांगणार आईला ?

**शामकांत** : मी कसा सांगणार ? पण तूच सांगून टाकशील.

**जाई** : मग आईनं विचारलं तर नको का सांगायला ?

**शामकांत :** ( हसत ) मग बसा पाठीला तेल लावून. धबाधबा दणकेच दणके.
**जाई :** ( भिऊन ) बाबा—
**शामकांत :** हे बघ—आता मी सांगतो असं कर—तू मुळी घरी जाऊच नकोस आता, ऊं ?
**जाई :** मग मी इथं राहू ?
**शामकांत :** खरंच राहाशील का जाई तू माझ्याकडं ? इथं तुला कोण्णी रागं भरणार नाही. कोण्णी कधी मारणार नाही—
**जाई :** बघा बरंऽ ? आम्हाला आहे माहीत. आधी असं म्हणता आणि मग—
**शामकांत :** नाही ग पोरी. खरंच, खरंच मी तुझ्या अंगाला हात लावणार नाही कधी.
**जाई :** ( विचारात पडत ) हूं. तुमचं घर आवडलं मला बाबा.
[ तिचे हे उद्‌गार ऐकताच धर्मा प्रवेशतो. तो चकितच होतो.]
**शामकांत :** आवडलं ना ? मग आजपासून तू इथंच राहायचंस. ठरलं !
**धर्मा :** शामबाबू—शामबाबू—
**शामकांत :** तू मध्ये बोलू नकोस; आज धर्मा— !
**धर्मा :** शामबाबू—ह्ये काय बरं नाय ! आपुन ज्या वाटेनं चालला हाय त्या वाटेवर तुम्हांला एकल्या धर्माची सोबत संगत पुरे हाय.
**शामकांत :** ( चिडून तोऱ्यात ) ती कपबशी उचल आधी आणि ही नोट घे. इराण्याचं बिल तावडतोब चुकतं करून ये अगोदर.
**धर्मा :** शामबाबू—
**शामकांत :** धर्मा— आज मी कोणाचं काही एक ऐकणार नाही.
**जाई :** माझंसुद्धा ?
**शामकांत :** तुझं ऐकेन. तू मागशील ते तुला देईन. म्हणशील तिकडं नेईन तुला. पण या घरात—माझ्या घरात तू राहायला हवंस. राहशील ना जाई ?
**जाई :** ( चॉकलेट खात ) मला एक छानदार बाहुली आणूनद्याल ?
**शामकांत :** हो हो. म्हणशील तसली बाहुली आणून देतो तुला. अग बाहुल्यांची रासच घालतो की तुझ्या पायावर.
**जाई :** एक झोपाळा बांधाल इथं ?
**शामकांत :** एकच काय—प्रत्येक हॉलमध्ये तुझ्यासाठी एक एक झोपाळा बांधून देतो. बोल—मग राहणार ना इथं ?
**जाई :** पण बाबा— माझी वेणी कोण घालणार इथं ?
**शामकांत :** मोठाच प्रश्न विचारलास ! अग, कोणी नाही तर मी घालीन.
**जाई :** हट्—तुम्ही काय बायको आहांत का ?
**शामकांत :** अग तुला स्टूडियोत नेऊन रोज तऱ्हतऱ्हेची वेणी घालून देईन. मग तर झालं की नाही ?

**जाई :** मग राहीन मी इथं.

**धर्मा :** ताई—

**शामकांत :** धर्मा, एक शब्द तिच्याशी बोलू नकोस तू. मुकाट्यानं तिच्या घरी जा आणि तिच्या आईला सांगून ये की आजपासून जाई इथं—याच घरात राहणार आहे !

**धर्मा :** शामबाबू. आईची जागा बापानं घ्यायची मंजी लई लई कठिन हाय. तुमाला जमायचं न्हाय ते !

**शामकांत :** ते तू जाईलाच विचार म्हणजे झालं !

**धर्मा :** ताई, आपुन हितं, या घरात— न्हानार !

**जाई :** हूं. मला बाई आवडलं हे घर. अंगण केवढं मोठ्ठं आहे नाही ?

**धर्मा :** मग घरी बाईसायबान्ला मी काय सांगू ? छोटे बाबू इचारील त्याला काय सांगू ?

**जाई :** प्रसादला मी इकडंच राहायला बोलावलंय म्हणून सांग. त्याला म्हणावं इथं चिकूचं झाड आहे, पेरूचं झाड आहे, झालंच तर— बाबा, आम्हाला अंगणात एक सी सॉ करून द्याल का हो ?

**शामकांत :** हो हो— तू म्हणशील ते देईन म्हटलं ना मी ? सी सॉ देतो, घसरगुंडी देतो, झोपाळा देतो, बॅट बॉल—काय हव्वं ते देतो. मग ?

**जाई :** मग प्रसाद नक्की येईल बाबा.

**शामकांत :** ऐकलंस ? घेऊन ये त्यालाही. माझी मुलं मला मिळालीच पाहिजेत.

**धर्मा :** ( जाईला ) मी इचारतो— घरी बाईसायबान्ला मी काय सांगू ?

**शामकांत :** ( चिडून ) धर्मा— पुनः पुन्हा तिला तोच प्रश्न तू का विचारतो आहेस रे ? तिचं मन बदलेल असं वाटतं तुला ?

**धर्मा :** शामबाबू—

**शामकांत :** ( विजयोन्मादाने ) तुला काय वाटलं ? आईच्याप्रमाणं मुलंदेखील माझा तिरस्कार करतील म्हणून ? अरे, किती झालं, मी काहीही केलं, कसाही वागलो, तरी मी तिचा बाप आहे बाप ? समजलास ?

**धर्मा :** पर शामबाबू—

**शामकांत :** जाई, आपल्या तोंडानं सांग पाहू त्याला, मी इथ्थं राहणार आहे म्हणून.

**जाई :** (घुटमळत हळूच) पण बाबा, प्रसाद माझ्याशी फार भांडतो. मारामारीदेखील करतो.

**शामकांत :** अग मी असल्यावर तो कसा भांडेल ? मी नाही त्याला मारामारी करू देणार बरं तुझ्याशी. तू अगदी घाबरू नकोस. सांग धर्माला.

**जाई :** अहो तसं नव्हे. तुम्ही सारखे काय घरातच बसणार आहात का ? तुम्ही बाहेर कामाला गेलात की तो माझ्याशी भांडेल, मला चिमकुटे घेईल, मला चावेलसुद्धा...

**शामकांत :** मग म्हणणं काय आहे तुझं ?

**जाई :** (बापाच्या मुद्रेवर पहात) ऊं सांगू का ? तो किनई फक्त आईचंच ऐकतो बाबा !

**शामकांत :** बरं मग ?

**जाई :** (त्याच्या मुद्रेकडे पाहून अंदाज घेत हळूच) आईलासुद्धा आणू या का इथं बाबा ?

**शामकांत :** (दचकून) काय ? आईला ? (क्षणार्धात कष्टी मनाने) तुझी आई येणार नाही इथं माझ्या घरी.

**जाई :** मग प्रसाद कसा हो येईल ? मग आम्हाला कोण खेळायला इथं ?

**शामकांत :** (खिन्नपणे हसून) म्हणजे मग तूसुद्धा इथं राहणार नाहीस, असंच ना ? (क्षणभराने मोठ्याने हसून) मीच वेडा खुळा आहे झालं !

**जाई :** असं नाही काही. दिवसा मी तुमच्या घरी राहीन आणि रात्री मात्र—

**शामकांत :** रात्री काय ?

**जाई :** झोपायच्या वेळेला खऱ्या खऱ्या घरी जाईन—चालेल ना बाबा ?

**शामकांत :** खऱ्या खऱ्या घरी म्हणजे ?

**जाई :** म्हणजे आईच्या पुढ्यात.

**धर्मा :** ह्यो नाद सोडून द्या शामबाबू. आपुन चाललात त्या वाटेवर ह्यो धर्मा तुम्हाला पुरा हाय. पोराबाळांचे हाल नका करू उगाच.

**शामकांत :** (खिन्नपणे) खरं आहे ! खरं आहे ! धर्मा— माझी वाटच वेगळी आहे. मला एकट्यानंच सगळा प्रवास रेटला पाहिजे.

**जाई :** (इकडे तिकडे बघत) बाबा— आईची मला फार आठवण येतीय.

**शामकांत :** (खिन्नपणे तिला कुरवाळीत) जा बाई— जा तू आपल्या घरी. या घरात काही मी तुला तुझी आई देऊ शकणार नाही.

**धर्मा :** ताई, लई उशीर जाला. आता घरी जाया होवं. न्हाय तर बाई—

**शामकांत :** जा पाहू तू आता घरी. (तिचा पापा घेतात.)

**जाई :** (गळ्यात दप्तर घालीत) बाबा— मला आईची भीती वाटते.

**शामकांत :** भीती ? का ग ?

**जाई :** मी तुमच्या घरी आले होते हे तिला समजलं तर रागावेल ती माझ्यावर.

**शामकांत :** तुझ्यावर रागावेल ? छे छे, अगं —

**जाई :** मला बजावलंय तिनं एकदा —

**शामकांत :** काय बजावलंय ?

**जाई :** बाबांच्या घरात पाऊल टाकलंस तर तंगडी मोडीन तुझी—असं म्हणाली होती आई. आता तिला समजलं तर ती नक्की मार देईल मला.

**शामकांत :** वेडी आहेस तू. मी सांगेन तुझ्या आईला.

**जाई** : तुम्ही येणार माझ्या बरोबर घरी ? खरंच ?

**शामकांत** : मी ? मी आलो असतो गं–! येईनसुद्धा ! पण माझ्या येण्याचा काय उपयोग ? पण...पण... असं कर. मी तुला पत्र देतो. ते तू तुझ्या आईला नेऊन दे म्हणजे ती—

**जाई** : म्हणजे, शाळेत जायला उशीर झाला म्हणजे आई आमच्या बाईंना चिठ्ठी देते तशी ?

**शामकांत** : (हसून) हो तशीच. (असे उद्गारत टेबलावरचे पॅड ओढून शामकांत पत्र लिहू लागतात. पण तेवढ्यात त्यांचा विचार बदलतो. पॅड दूर सारीत, पेनला झाकण घालीत आर्त स्वरात–) धर्मा–

**धर्मा** : जी धनी ?

**शामकांत** : तू जाईला घरी नेऊन पोचव. पोचवशील ?

**धर्मा** : पोचिवतो की शामबाबू !

**शामकांत** : माझ्या वतीनं तूच जाईबद्दल तिच्या आईजवळ रदबदली कर. करशील ?

**धर्मा** : जी हां धनी. पर आपुन चिट्टी दिली असल्यी मंजी...

**शामकांत** : (प्रक्षोभ आवरीत) नको, पत्र नकोच. माझं पत्र ती वाचणारसुद्धा नाही. तस्सं फाडून टाकील. मागची आठवण आहे ना तुला धर्मा ?

**धर्मा** : त्या येळचं समदंच येगळं हुतं. पर आता—

**शामकांत** : नको, नकोच ते. तूच तिला समजावून सांग.

**धर्मा** : जी धनी. चला ताई. बाई घरी वाट बघत अस्त्याल—

**जाई** : जाऊ मी बाबा ?

**शामकांत** : जा बाळ, जा. तुझी आई वाट बघत असेल घरी. पुन्हा केव्हा येशील आता ?

**जाई** : (घुटमळत) पुन्हा ? पुन्हा नं...? पुन्हा म्हणजे किनई...

**शामकांत** : पुन्हा काही तू माझ्या घरी येणार नाहीस, असंच ना ?

**जाई** : असं नाही काही. अहो तुम्हीच आता आमच्या घरी राहायला येणार ना ?

**शामकांत** : मी ? वेडी आहेस. अगं ते कसं शक्य आहे ?

**जाई** : इतक्यातच विसरलात का ?

**शामकांत** : काय विसरलो ?

**जाई** : ते ते—थोबाडीत मारून घ्यायची, देवापुढं उभं राहून कान धरून चुकलो म्हणायचं—

**शामकांत** : आणि नाक घासायचं. ते ना—? अगदी छान लक्षात आहे.

**जाई** : तुम्ही तेवढं करा. बाकीचं सांगेन मी आईला.

**शामकांत** : (हसत) बरं बरं. घासण्याइतपत मला नाक उरलं असलं तर घासेन मी.

**जाई** : काय म्हणालात ?

**शामकांत :** (हसत) काही नाही ! काही नाही.
**जाई :** आणि संध्याकाळी पार्कवर यायचं, येणार ना ?
**शामकांत :** येईन बरं मी. अगदी नक्की.
**जाई :** जाते हं बाबा. टाटाऽ— (दारापर्यंत जाते. एकदम काही तरी आठवून मागे फिरत—) बाबा—
**शामकांत :** काय गं ?
**जाई :** विसरलेच मी !
**शामकांत :** काय विसरलं तुझं ?
**धर्मा :** खाऊचा पुडा ठेवलाय मी दप्तरात ताई !
**जाई :** (धावत जवळ येऊन) तुमची पाठ बघू ?
**शामकांत :** पाठ ? माझी पाठ ? ती कशाला गं ?
**जाई :** आधी पाठ करा माझ्याकडं. (शामकांत पाठ करून उभे राहतात. त्यांची पाठ चाचपत) जखम बरी झाली तुमच्या पाठीची ?
**शामकांत :** (चकित होऊन) जखम ? जखम कधी झाली होती माझ्या पाठीला ?
**जाई :** नाही कशी ? काल तुमच्या सिनेमात पाहिलं की मी. केवढ्यांदा खंजीर खुपसला तुमच्या पाठीत त्या बाईनं. (शामकांत हसतात.) हसताय काय ?
**शामकांत :** अग ते खरं समजलीस तू ? खोटं खोटं मारतात.
**जाई :** पण तुम्ही ओरडलात किती मोठ्यानं ? मला रडायला आलं की ? झोपसुद्धा लागली नाही मला काल.
**शामकांत :** (गहिवरून) जाई—म्हणजे...म्हणून...म्हणून का तू मला बघायला आली होतीस आज ? (जाई मानेनेच 'होय' म्हणते. शामकांत गहिवरून तिला पोटाशी घेतात. त्यांना उमाळा अनावर होऊ लागतो.) जाई...जाई...
**धर्मा :** ऊं हूं...शामबाबू—
**शामकांत :** मला एकदा तरी पोट भरून रडू दे रे धर्मा—
**धर्मा :** ताईंना जायच्या येळेला रडवायचं हाय का ?
**शामकांत :** (कष्टाने अश्रू आवरीत) खरं आहे. बरोबर आहे तू म्हणतोस ते. (मग कष्टाने हसरी मुद्रा करीत) माझी अगदी काळजी करू नकोस बरं जाई. आता कोणीही माझ्या पाठीत खंजीर खुपसणार नाही. जा— जा तू आता.
**जाई :** टा टाऽ ! बाबा— आता आज संध्याकाळी...पार्कमध्ये. विसरायचं नाही हं.
**शामकांत :** नाही विसरणार. जा. टाटा—

[धर्मा जाईचा हात धरून जाऊ लागतो. शामकांत करुण मुद्रेने बघू लागतात. दारापर्यंत ती दोघे जातात तोच— ]

**शामकांत :** धर्मा—
**धर्मा :** (दारातच थबकून वळून) काय धनी ?

**शामकांत** : तिला माझा एक निरोप सांग. तिला– जाईच्या आईला. सांगशील ?
**धर्मा** : काय सांगू ?
**शामकांत** : ( गहिवरून ) तिला सांग...तिला सांग...माझ्या अपराधाचं प्रायश्चित्त मी भोगतो आहे. जन्मभर मी तेच भोगणार आहे. पण जाईला–माझ्या जाईला त्याची शिक्षा करू नकोस ! ( धर्मा आणि जाई जातात. दार ढकलून घेतल्याचा आवाज. शामकांतांना गहिवर अनावर होतो. उठून खिडकीपाशी जाऊन दूर जाणाऱ्या जाईकडे ते क्षणार्ध बघत राहतात. त्याच वेळी त्यांना दबलेला हुंदका फुटतो. तळव्याने ते तोंड झाकून हुंदका देत असतानाच– )

प ड दा

# अंक दुसरा

[ त्याच दिवशी सकाळी अकरा वाजण्याचा सुमार ! शामकांतची पत्नी मंगला हिचे घर. ' घर ' म्हणजे एका गजबजलेल्या पेठेत तोल सावरून उभ्या असलेल्या वाड्यातील दोन खोल्यांचे एक बिऱ्हाड. असल्या बिऱ्हाडातूनच पोटात पीळ राखून हातातोंडाच्या मिळकतीत जिद्दीने झगडत जगणारे मानी मनाचे पांढर-पेशे राहतात. समोर दिसते आहे ते स्वयंपाकघर. पण ते नुसते स्वयंपाकघर नव्हे. एका कोपऱ्यात चूल आहे; भांड्यांचे शेल्फ आहे; दुभत्याचे छोटे कपाट आहे. तसेच दुसऱ्या कोपऱ्यात एक जुनाट टेबल खुर्ची, टेबलावर वह्यांचा गठ्ठा आणि पुस्तके दिसताहेत. पलीकडेच जमिनीवर अंथरलेली सतरंजी आणि आल्यागेल्याच्या स्वागतासाठी टेकण्यासाठी गुंडाळून ठेवलेली वळकटी. समोरच्या भिंतीत येण्याजाण्याचा मुख्य दरवाजा. टेबलाशेजारी गजांची खिडकी. बाहेर छोटेसे अंगण. आजूबाजूला आणखीही काही बिऱ्हाडे असावीत. स्वयंपाकघराच्या दुसऱ्या भिंतीत आतल्या एका अंधाऱ्या खोलीत जाण्याचा दरवाजा. ती बहुधा निजण्याबसण्याची वा सामान ठेवण्याची खोली असावी. चुलीशेजारीच छोटी मोरी आहे. नळही आहे. पण नित्याप्रमाणेच नळाला पाणी येत नसावे. म्हणूनच पाणी साठवण्यासाठी एक पितळी हौद मोरीच्या कटड्यावर ठेवलेला दिसतो आहे. बाहेरच्या दाराच्या एका फळीवर ' सौ. मंगला देशपांडे ' बी.ए., बी.टी. अशी पाटी लावली आहे. त्याखालीच रंगीत खडूने 'येथे कु.जाई देशपांडे ४ थी अ राहते' अशी बहुधा जाईने स्वतःच रंगवलेली दुसरी पाटी दिसते आहे. टेबलाशेजारील गजांच्या खिडकीपाशी भिंतीतल्या एका फडताळावरही ' जाईचे कपाट ' असे खडूने लिहिले असून त्याखाली ' परवानगीशिवाय कपाटाला हात लावण्याची सक्त मनाई आहे ' अशी अशुद्ध लेखनातली धमकीही नोंदवून ठेवण्यात आली आहे.

उघडच सगळीकडे जागत्या दारिद्र्याची छाया स्पष्ट दिसते. पण स्वच्छता, टापटीप आणि अभिजात रसिकता जागजागी प्रत्ययाला येते. एखादी तसबीर, एखादेच कॅलेंडर, एखादीच फुलदाणी वा कोनाड्यातील सुबक देव्हाऱ्यातील एखादीच सुबक मूर्ती या रसिकतेची साक्ष देतात.

पडदा वर जातो त्या वेळी चुलीवरचा स्वयंपाक सिद्ध होऊन भांड्यावर झाकणे चढली आहेत. थोड्या वेळाने कमरेवर भरली घागर घेऊन मंगला प्रवेशते आणि हौदात ती रिकामी करते. मंगला सुमारे तीस वर्षांची, देखणी. मुद्रा मूळची प्रसन्न, खेळकर– पण जीवनातल्या उग्र अनुभवाने कठोर, करारी झालेली, मनमुराद हसण्या-बोलण्याची आवड अकाली करपलेली. आता थोडेच बोलावे, जरुरीपुरतेच बोलावे, मनाने दूर अलिप्त राहावे, ही स्वभावाला हेतु-पुरस्सर दिलेली शिकवण बोलण्या-चालण्यात सहज प्रगट होते. या स्त्रीच्या मानी मनाला कुठेतरी जखम झालेली असावी असे प्रथमदर्शनीच वाटते; अधिक परिचयानंतर तर खात्रीच पटते. पण त्या जखमेभोवती पोलादी कुंपण घातले आहे. परिचितांनाही जवळपास मायेचे शब्द घेऊनही फिरकण्यास बंदी आहे.

मंगला घरात येऊन हौदात पाण्याची घागर रिकामी करते आणि पदराने कपाळावरील घर्मबिंदू टिपते. तेवढी चाहूल लागून शेजारच्या बिऱ्हाडातून कोणी मावशी ओरडून विचारतात— ]

**मावशी :** जेवणं आटोपली का मंगलाबाई ?

**मंगला :** छे बाई ! माझा आहे आज उपवास. पण बयाबाई तरी कुठं आल्यात अजून घरी ?

**मावशी :** अजून शाळा सुटली नाही का पोरीची ? अकरा वाजून गेले.

**मंगला :** बघा म्हणजे झालं. प्रसादला विद्यामंदिरात पोचवून मी परतले तरी हिचा पत्ता नाही मावशी.

**मावशी :** मग तपास करायला पाठवायचं का कोणाला ? नानू घरीच आहे आज. हवं तर सांगते मी त्याला.

**मंगला :** नको नको, तशी काही वेळ टळून गेली नाही अगदी. थोडा वेळ वाट बघून मीच जाऊन येईन.

**मावशी :** भलतंच ? बाहेर ऊन कोण तापलंय आणि—

**मंगला :** सवय झालीय आता मला या उन्हाची मावशी—

**मावशी :** तुम्ही म्हणजे अशा आहात—

**मंगला :** नोकरी करणाऱ्याला ऊन-पाऊस म्हणून चालत नाही मावशी !

**मावशी :** पण आताच तर तुम्ही शाळेतून आलांत म्हणून—

**मंगला :** म्हणून काय झालं ?

**मावशी :** सांगते काय– एवढासुद्धा कोणाचा उपकार घ्यायचा नाही, असा पण केल्या-गत वागता तुम्ही. आम्हाला नाही बाई हे आवडत.

**मंगला :** (हसून) पण बीण नाही हो माझा काही. आपल्या कामासाठी पाय झिज-वायला नकोत आपण ? शिवाय सामान आणायला वाण्याकडं जायचंच आहे मला.

तेव्हा—

**मावशी** : वाण्याकडं ? आत्ता ? या वेळेला ? तुम्ही जाऊन आणणार ?

**मंगला** : मग कोण आणणार ? केव्हा आणणार ? दुपारची सुटी आहे म्हणून बाळ-आंब्याचं लोणचं घालायचं ठरवलंय मी आज. जाईला आवडतं फार.

**मावशी** : अहो, पण त्यासाठी तुम्हीच पायपीट करायला हवी का उन्हातान्हाची ?

**मंगला** : मुलं लहान आहेत मावशी माझी. नोकरी करून घर सांभाळायची पाळी आली म्हणजे माणसाचे सगळे हट्ट नि सगळ्या मिजाशी मोडतात !

[ मंगलेच्या या प्रत्युत्तरावर, मावशी अस्पष्टपणे काही पुटपुटल्याचे ऐकू येते. हा संवाद चालू असताना मंगला स्वस्थ नाही. बाहेर जाण्याची तिची तयारी चालू आहे. क्षणभराने तयारी पूर्ण होते आणि मंगला पर्स आणि पिशवी घेऊन पायात चपला घालते. ऊन लागू नये म्हणून डोक्यावर पदर घेऊन बाहेर जाण्यासाठी निघते. क्षणभर दारात घुटमळते. वाकून रस्त्यावर न्याहाळून पाहते मग मनाशी काही ठरवून— ]

**मंगला** : मावशी— मी पाच मिनिटांत कोपऱ्यापर्यंत जाऊन येते, जाई आली एवढ्यात तर सांगा तिला. दार नुसतं ढकलून घेते हो—!

**मावशी** : आहे मी इथंच पुढल्या दारी. काही काळजी करू नका तुम्ही.

[ मंगला दार ढकलून घेते आणि जाते. क्षणभराने जाई आणि पाठोपाठ धर्मा प्रवेशतात. जाई गजांच्या खिडकीतून टाचा उंचावून डोकावत— ]

**जाई** : " ए आईऽऽऽ ! आईऽऽयंऽऽ मी आलेय ! मी मी– जाई ! "

[ तेवढ्यात धर्मा खिडकीतून डोकावून बघतो आणि न्याहाळत– ]

**धर्मा** : बाईसाब दिसत न्हाइती घरात—!

**जाई** : ( उसळून ) असं कसं ? नाही म्हणजे ? का नाही ? आम्ही शाळेतून घरी यायचं आणि आईनं मात्र घरात नसायचं, म्हणजे काय ? आईऽऽयऽ ए—

[ तेवढ्यात मावशी जाईला हाकारतात. तशी ' ओ ' देत जाई शेजारी जाते. धर्मा दार उघडून घरात येतो. न्याहाळतो, मग दाराशीच अदबीने उकिडवा बैठक मारून बसतो. खिशातून बिडीकाडी काढून शिलगावण्याची तयारी करतो. पण तेवढ्यात या घरात बिडी ओढलेली बाईंना खपायची नाही, याची याद येऊन किंचित ओशाळून बिडीकाडी पुन्हा खिशात कोंबतो, तेवढ्यात जाई दप्तर घेऊन उड्या मारीत येते—]

**जाई** : ( आत येत दप्तर सतरंजीवर दाणकन् आदळत ) बघ, सांगितलं नाही मी तुला ? अरे आई काही बाहेर गेली नाही. इथं कोपऱ्यावर गेलीय. मावशींना सांगून गेलीय.

**धर्मा** : कोपऱ्यावर ?

**जाई** : हूं. अरे वाण्याकडं सामान आणायला.

**धर्मा** : वाण्याकडं सामान आणाया ?
**जाई** : हो ना ! अरे आमची सकाळची शाळा नव्हती का आज ?
**धर्मा** : हां हां– पर—
**जाई** : पर काय ? वाण्याकडून सामान मी आणते नेहमी. एकटी एकटी बरं का ?
**धर्मा** : येकल्यानंच ?
**जाई** : मग ? तुला काय वाटलं ? आम्हाला काही पूर्वीसारखं फसवत नाही कोणी आता.
**धर्मा** : खरं की काय ?
**जाई** : मग ? अरे मी मोठी नाही का झाले आता ?
**धर्मा** : व्हय का ?
**जाई** : धर्मा, घोडी मोठी कशी होतात रे ?
**धर्मा** : ( विस्मयाने ) घोडी ? मोठी ?
**जाई** : आई नेहमी म्हणते मला– एवढी मोठी घोडी वाढलीस, तुला हे कसं कळत नाही न् ते कसं कळत नाही ( धर्मा हसतो, तशी चिडून ) हसतोस काय ? मी घोडी आहे होय रे ?
**धर्मा** : ( हसू आवरीत ) छा छा, भलतंच !
**जाई** : आज लोणचंसुद्धा मी घालणार आहे. झाडावर चढून माक्कुल्या एवढ्या एवढ्या कैऱ्या मी काढल्या आहेत बरं का ! दाखवू का तुला ?
**धर्मा** : नगं नगं– तसल्या कामात आपली सवारी लई हुश्शार है. ठावं हाय मला. ( असे म्हणत धर्मा जमिनीला टेकतो. ते पाहून जाई– )
**जाई** : एऽऽऽ अरे जमिनीवर काय बसलास ? धोतर मळेल ना तुझं ? ऊठ ऊठ खुर्चीवर बस असा–( त्याला बळाने हाताला धरून खुर्चीवर बसवू लागते. )
**धर्मा** : ( अनमान करीत ) मला कशापाई होवी खुर्ची न् फिरची ! ह्यो हाय ते ठीक हाय.
**जाई** : अरे तुला जमिनीवर बसलेला पाहिला तर आई मला रागवायची नाही का ? ते काही नाही– ऊठ, ऊठ आधी. या खुर्चीवर बैस. ( अखेर धर्मा खुर्चीवर बसू लागतो. तो खुर्चीचा एक पाय लपकलेला. खुर्ची कलंडते आणि धर्मा जमिनीवर सपशेल आदळतो. जाई हसू लागते आणि– ) अरे अरे– पाय मोडलाय खुर्चीचा. नीट संभाळून बसता येत नाही खुर्चीवर ? ( खुर्ची नीट उभी करून स्वतः बसून दाखवीत—) अरे असं बसायचं !
**धर्मा** : मला नगं ती खुर्ची. मी जिमिनीवरच बरा हाय.
**जाई** : मग सतरंजीवर तरी बस. ( त्याला हाताला धरून बळाने सतरंजीवर वळकटी-पाशी नेऊन बसवते. ) मागं टेक. टेक ना–! अरे टेकायसाठी तर वळकटी ठेवलीय तिथं. ( धर्मा टेकतो. ) हूं. आता बरं वाटलं ना ?–( मग वाकून खुर्चीचा पाय,

आपल्या मते दुरुस्त करीत) प्रसादनं मोडून टाकली बघ ही खुर्ची. फार दांडगाई करतो बघ. आता आईचा पगार झाला ना की नवी नवी खुर्ची आणणार आहे आई. (धर्मा मान डोलावतो.) तुमच्या घरी किती छान छान खुर्च्या आहेत, नाही रे? गादीच्या, मऊ मऊ? (धर्मा 'व्हय व्हय!' उद्गारतो) अहा! एवढी ऐट नको काही. आम्हीसुद्धा आमच्या घरी तश्शीच गादीची मऊ मऊ खुर्ची आणणार आहोत आता.

**धर्मा** : इकतं कशापाई? साहेबांच्या बंगल्यावर रग्गड हैती खुर्च्या. दोन उचलतो आन हितं आणून टाकतो येता जाता कवाबी!

**जाई** : बाबांच्या खुर्च्या? आणि इथं? आईचे दणके खायचेत वाटतं?

**धर्मा** : दणके?

**जाई** : तुला नाही रे, मला. तू खुर्च्या आणल्यास की आई नक्की म्हणणार की हा या पोरटीचा कारभार. येऊ दे तर घरी, चांगला डाग देते—

**धर्मा** : नाय बा.

**जाई** : नाही काय? तुला काय माहीत आहे? (डेऱ्यातले ग्लासने पाणी काढून पिते, मग धर्माकडे वळून—) पाणी हवंय तुला? आई आल्यावर तुझ्यासाठी सरबत करील.

**धर्मा** : सरबत? नग, पानीच द्या वाइच—थंडगार.

(जाई ग्लास विसळून धर्माला पाण्याने भरून देते. धर्मा गटागटा पाणी पितो.)

**जाई** : (आठवण होऊन) धर्मा—मी बाबांच्या घरी आले होते हे आईला सांगायचं नाही बरं का!

**धर्मा** : पर ताई—

**जाई** : पण नाही न् बिण नाही. रस्त्यावर कबूल केलंयस तू मला. आमचं काही जात नाही. तुला देवाची शप्पथ लागेल.

**धर्मा** : मी न्हाइ बोलणार, पर ताईबाईनीच पुसलं तर—

**जाई** : तर आईला काय सांगायचं ते मी सांगेन.

**धर्मा** : पर काय सांगणार?

**जाई** : सांगेन काही तरी.

**धर्मा** : लबाड बोलणार?

**जाई** : (उसळून) तु तरी बराच आहेस की रे? मग खरं सांगून आम्ही उगीचच्या उगीच मार खावा वाटतं? (थोडा वेळ विचारात पडत) मी काही खोटं नाही सांगणार.

**धर्मा** : मग?

**जाई** : मग काय? पण खरं खरंही नाही सांगणार.

**धर्मा** : लबाड बी बोलणार न्हाय आन खरं बी सांगणार न्हाय! म्हंजी?

[ तोच पावले वाजतात आणि मंगला प्रवेशते. तशी जाई उत्साहाने धावून जात आईला बिलगते—]

**जाई :** आईऽऽ !

**मंगला :** अगबाई ! धर्मा ? तू ? तू कसा आलास ? केव्हा आलास ?

**धर्मा :** कसा नि कवा म्हंजी आता पगा बाई—

**मंगला :** ( काळजीने ) सगळं ठीक आहे ना ? प्रकृतीचं विचारतेय मी ?

**धर्मा :** प्रकृतीला काय धाड झालीया—

**मंगला :** ( हसून ) तुझ्या नाही रे – तुझ्या साहेबांच्या !

**धर्मा :** हां हां, असं इचारा की. हाय, तब्येत मस्त हाय सायबांची.

**मंगला :** अचानक मध्येच उन्हाचं आलास म्हणून विचारलं. आणि जाई, काय ग तुझं हे येणं ? शाळेत शोधायला—

**जाई :** गेली होतीस शाळेत ?

**मंगला :** गेले नव्हते – पण जाणार होते.

**जाई :** अग मी तरी काय करू ? आमच्या बाईंनीच लवकर सोडलं नाही. सारखी कवाईत करून घेत होत्या.

**मंगला :** कवाईत ?

**जाई :** अग शेवटचा तास कवाइतीचा नव्हता का ?

**मंगला :** एवढ्या उन्हात बाई कवाईत घेत होत्या ?

**जाई :** बाई नव्हत्या ग घेत. आम्हांला खेळ सांगून त्या आपल्या निघूनच गेल्या. मग कुंदा आपटे आणि मंदा पाटील म्हणाल्या की आपण घरी जाऊ या म्हणून.

**मंगला :** मग कुंदाच्या घरी का गेली होतीस तू ?

**जाई :** कुंदाच्या घरी नव्हे ग. जेवायच्या वेळी लोकांच्या घरी मी कशी जाईन ?

**मंगला :** अग पण मग तुला इतका उशीर कसा झाला ? खरं खरं सांग पाहू ?

**जाई :** अग मी किनई रस्त्यानं चालले होते ना, तर या धर्मानंच मला उशीर केला.

**धर्मा :** ( चकित होत ) मी ?

**जाई :** हो, तूच. आम्हाला कशाला बागेत बोलावलंस ? आम्हाला कशाला घरात नेऊन कोको दिलास ? मी मागितलं नव्हतं तर आम्हाला कशाला वर नेऊन चॉकलेट दिलंस ?

**धर्मा :** तर ताई—

**जाई :** आता खोटं नको बोलूस. मी म्हटलं होतं की नाही तुला की आई मला रागवेल म्हणून ? आई, यानं मला अडवलं आणि त्यांनी मला जाऊ दिलं नाही बघ.

**मंगला :** त्यांनी ? त्यांनी म्हणजे कोणी ?

**जाई :** ( हळूच आईच्या मुद्रेकडे पाहात अंदाज घेत ) हो– बाबांनी—

**मंगला :** बाबांच्याकडं गेली होतीस तू ?

**जाई :** हो, पण मी काही मागितलं नाही हं. सगळं त्यांनी आपण होऊनच दिलं मला.

हो किनई रे ? (गडबडीने दप्तरातला खाऊचा पुडा काढीत) प्रसादचा हा खाऊ मी काही खाल्ला नाही बरं का. आणि बरं का आई—

**मंगला :** मला न विचारता बाबांच्याकडं गेलीस आणि मला—

**जाई :** पण मी खोटं नाही सांगितलं. अगं म्हणजे झालं काय– शाळेत शेवटचा तास कवाइतीचा होता नं—

**मंगला :** काही सांगू नकोस तू आता मला. (रागाने पाठ फिरवून मंगला कपाटापाशी जाते आणि पिशवीतील जिनसा काढून ठेवू लागते. तशी जाई गोरीमोरी होते. आईच्या मागे जात तिला बिलगत—

**जाई :** (काकुळतीने) आई–अगं खरंच...मी मुद्दाम नव्हते ग गेले...ए आईऽ बोल ना माझ्याशी...आई... बोल ना...(मंगला तिला दूर सारते. तशी जाई कळवळते आणि हळूहळू उमसून रडू लागते. मुसमुसून रडत–) माझं चुकलं आई. मीच गेले होते बाबांच्या घरी...आपण होऊन...कोणाला न सांगता. (क्षणभर वाट पाहून कोनाड्यातल्या देव्हाऱ्यापाशी जाई जाते आणि स्वतःच्या एक थोबाडीत मारून घेते आणि रडत कान धरून दोन उटाबशा काढीत–) देवबाप्पा, चुकलं माझं. पुन्हा नाही हो आईला कधी मी खोटं सांगणार.

**मंगला :** असं म्हटलं म्हणजे झालं ?

**जाई :** नाही ग आई– मी कधी तरी खोटं बोलते का तुझ्यापाशी ?

**मंगला :** पण आज तरी का बोललीस ?

**जाई :** मला तुझी भीती वाटली आई. मी बाबांच्या घरी गेले म्हणून फार फार रागावशील—

**मंगला :** एवढं माहीत होतं तर गेलीस कशाला त्या गटारात ?

**जाई :** (निष्पाप विस्मयाने) गटारात ? छे ग, गटारात नाही. अग बाबा छान छान घरात राहतात. तुला कोणी तरी खोटेच सांगितलंय. वाटल्यास तू येऊन पाहा.

**मंगला :** काही नको. पाहिले तेवढे सोहळे पुष्कळ झाले. आवडलं असलं तुला इतकं तुझ्या बाबांचं घर तर ऊठ आणि चालती हो. जा– जाऊन राहा त्यांच्याकडं.

**धर्मा :** पर बाई—

**मंगला :** तिच्यासाठी कोण्णी रदबदली करायची गरज नाही धर्मा.

**जाई :** (स्फुंदत) असं नाही ग आई. (खरंच... खरऽऽरंच सांगते मी आई... पुन्हा नाही कधी मी बाबांच्या घरी जायची. अगदी कध्धी जायची नाही.

**मंगला :** (जाईने काढलेला खाऊचा पुडा उचलून धर्मासमोर टाकीत) हा खाऊ परत घेऊन जा धर्मा.

**धर्मा :** बाई—

**मंगला :** असली साखरपेरणी मी दोन पायांवर धडधाकट उभी आहे तोवर या घरात चालायची नाही. माझा निरोप सांग त्यांना.

**जाई** : आई, पण खाऊसाठी काही मी बाबांच्या घरी गेले नव्हते ग.

**मंगला** : मग काय त्यांची पूजा करायला गेली होतीस ?

**जाई** : ( स्फुंदत ) बाबांच्या पाठीला खरीच जखम झालीय का ते पाहायसाठी गेले ग मी.

**मंगला** : ( विस्मयाने ) जखम ?

**जाई** : कालच्या सिनेमात खंजीर मारल्यावर बाबा कसे ओरडले आणि कसे कोलमडून पडले—

**मंगला** : ( विरघळत ) जाई—

**जाई** : मला ग काय माहीत सिनेमात खोटं खोटं मारतात म्हणून ?

**मंगला** : मी तुला सांगितलं नव्हतं ?

**जाई** : तू कुठं पाहिला होतास त्यांचा सिनेमा ? मंदा मला म्हणाली—

**मंगला** : आईपेक्षा मंदावर तुझा जास्त विश्वास ! मला सांगून गेली असतीस तर मी काय नको म्हटलं असतं ?

**जाई** : ( डोळे पुसत ) मागं विचारलं होतं एकदा तेव्हा मोठे डोळे करून तंगडी मोडीन असं कोण म्हणालं होतं बरं ?

**मंगला** : ( राग निवळून स्मित करीत ) बरंच लक्षात ठेवतीस ग ठमाबाई !

**धर्मा** : बापावर लई जीव हाय छोट्या ताईचा बाई !

**मंगला** : हूं ! पण त्यांना आहे का त्याची काही पर्वा ? बोलले का तरी धड ?

**धर्मा** : असं का म्हणता बाई ? ताई बंगल्यावर आल्या तर घटकाभर शामबाबू लहान पोरागत आनंदानं घरभर नाचले.

**मंगला** : नाचले ? शुद्धीत होते ना ? का आता दिवसादेखील—

**जाई** : आणि बर का आई—

**मंगला** : तुझ्या गप्पा पुरे झाल्या. दप्तर कुठं टाकलंयस ? ( जाई जीभ चावते आणि झटकन उठून दप्तर फडताळात नेऊन ठेवते. ) आत जाऊन फ्रॉक बदल: घडी करून नीट तारेवर ठेव. सोमवारी पुन्हा तोच घालायचा आहे हं.

**जाई** : ( जाता जाता घुटमळत ) आई, संध्याकाळी मी पार्कमध्ये जाऊ ?

**मंगला** : का– ? सकाळी बाबांची भेट झाली तेवढी पुरे झाली नाही ?

**जाई** : ( विस्मयाने ) तुला कोणी सांगितलं आई ? तुला ग कसं कळतं हे ?

**मंगला** : मला आपोआप सगळं कळतं. जा आधी कपडे बदल, हातपाय धू आणि पान घे आपलं. जेवायचं आहे ना– का—

**जाई** : ( जाता जाता थबकून ) अग आई, तुला कोणी तरी फसवलंय.

**मंगला** : फसवलंय ? म्हणजे ?

**जाई** : अग बाबांच्या घरी ती सटवी स्वैंपाक करीत नाही. बाबा खानावळीत जेवतात. खर्रं ऽच ! हो की नाही रे धर्मा ?

**मंगला :** बरं बरं, समजला तुझा शहाणपणा. जाऊन कपडे बदल आधी. ( जाई पटकन् आत जाते. धर्मा ' छा छा ' करून खुदकन् स्वतःशीच हसतो. तशी ) का रे ? हसायला काय झालं ?

**धर्मा :** काय नाय जी... अगदी मास्तरावानी जाम केलंत पोरीला.

**मंगला :** मास्तरावानी म्हणजे ? अरे मास्तरीणच आहे मी हाडाची.

**धर्मा :** त्ये काय खोटं नाय– पर इतकं त्ररी कशापाई ? अगदी छडी उगारल्यागत ?

**मंगला :** तू तर इन्स्पेक्टर्सारखी तपासणीच चालवली आहेस माझी ?

**धर्मा :** नाय बा– मला काय कळतंय– पर वाइच...

**मंगला :** ( इतक्या वेळात तयार केलेला सरबताचा पेला पुढे करीत ) हे सरबत घे आणि मग ( डब्यातून दोन पेढे काढून पुढे करीत ) हे दोन पेढे तोंडात टाक.

**धर्मा :** पेढे ? पेढे कशापाई ?

**मंगला :** अरे शाळेची प्रमुख म्हणून या महिन्यापासून माझी बढती झाली.

**धर्मा :** मंजी मंजी... हेडमास्तरच की–! लई लई छान झालंय...

**मंगला :** आता हाल संपतील पोरांचे. चार पैसे शिल्लक टाकता येतील मला.

**धर्मा :** सायबांना बी लई आनंद व्हईल. ह्यो पेढे बंगल्यावर नेतू बाई...

**मंगला :** त्यांना काय त्याचं कौतुक ? ते सरबत घे आधी.

**धर्मा** ( सरबताचा पेला उचलीत ) सकाळपून मस्त चापानी जालंया. लिंबूपाण्याची काय बी गरज नवती बाई !

**मंगला :** असं कसं ? अरे जाईला घेऊन इतक्या उन्हाचं आलास—

**धर्मा :** आलो म्हंजी ? काइ लोकाच्या घरचं काम केलं व्हय ?

**मंगला :** ( हसून ) आमचं घर म्हणजे तुला तरी लोकांचंच घर की ?

**धर्मा :** ह्यो काइतरीच तुमचं बोलणं !

**मंगला :** मग सांग, महिनाभरात एकदा तरी फिरकलास का इकडं ?

**धर्मा :** न्हाय फिरकलो, खरं हाय. पर माज्या मनातलं योक बोलू बाई ? माला ह्ये– ह्ये काय बी गोड लागत नाय. थितं तो तमाशा आन हितं—

**मंगला :** इथं काय ?

**धर्मा :** काइ ते तुमालाच ठावं ! दोन शबुद बोललो तर म्हंगाल गडीमाणसांची जीबच लई चुरचुराया लागलीया आताशा—

**मंगला :** अरे पण तुला गडी माणसासारखा या घरात कोणी वागवलाय का कधी ?

**धर्मा :** म्हनू जीव तिळतिळ तुटतोय माजा. चुकलं माकलं तर दोन रट्टे हाणा माज्या टाळक्यात, पण बाई शाप सांगतू– पोरीला आज तडातडा बोललाय आपुन.

**मंगला :** बोलले म्हणजे ? बोलायची हौस होती मला ?

**धर्मा :** पर मी पुसतू , आव असा गुना तरी काय केलाय पोरीनं ?

**मंगला :** मला खोटं बोललेलं आवडत नाही– तुला ठाऊक आहे धर्मा !

**धर्मा** : खरं आन खोटं ! आमी अडानी मानसं. ह्यो शानपना आमाला काय बी उमगत नाय. अवं बाई, ग्रोटावडी पोर– तिला काय ठावं खरं न् खोटं ! माया हाय म्हनून बापाला बगाया प्वोर धावली, मंजी काई कुणाच्या घरची चोरी तर नाय केली ? मायेबिगर कोन कुनाच्या घरचा फुकाचा उंबरटा जिजवतो बाई ?

**मंगला** : ( उसळून ) मायेच्या गोष्टी तू, तू मला शिकवतोस ? माणसांची माया समजते मला धर्मा– पण माणसं ' माणसं ' राहिलीत का त्या घरात ?

**धर्मा** : इतका राग धरनं बरं नाय बाई !

**मंगला** : ते बायकोच्या जन्माला आल्याशिवाय तुला कळायचं नाही धर्मा !

**धर्मा** : मला ठावं हाय बाई– आपुन लई लई सोसलाया—

**मंगला** : होय ना– मग मी सोसलंय तेवढं पुष्कळ झालं. आता पुन्हा त्याची मुलांना झळ नको !

**धर्मा** : पर बाई शामबाबूंना बी मन हाय, काळीज हाय– बायकापोरांची याद आली की अजून टिपं गाळत्यात शामबाबू...

**मंगला** : आणि टिपं सुकायच्या आत घरीदारी पुन्हा धिंगाणा सुरू करतात. असंच ना ? काही सांगू नकोस तू धर्मा. बारा वर्षांत मगळे सगळे सोहाळे पाहिलेत मी.

**धर्मा** : येगळं घर थाटून आपुन सुटलात, पर ह्यो सोहाळ्याचं कायम धनी केलंत ह्यो धर्माला !

**मंगला** : त्याला जबाबदार तूच. मी घर सोडलं त्या वेळी तुला ' चल ' म्हणाले नव्हते मी ? तेव्हा तुला साहेबांचा उमाळा आला होता. मग—

**धर्मा** : माज्या गुनाच्या बये, पुना पुना का मला छेडतीयास ? मी थितं का -हाइलो त्ये तुला न्हाय कधी उमगायचं. बये मला सांग, उद्या तुजं लेकरू मोटं जालं आन ते पोर येडं वाकडं थेर कराया लागलं तर—

**मंगला** : ( भडकून ) अरे मन मारून या या असल्या संसारात अहोरात झिजतेय मी. डोळ्यांत तेल घालून जळतेय मी. मुलांच्या भोवती खडा पाहारा उभा आहे माझ्या दृष्टीचा. माझी मुलं वेडी वाकडी थेरं करतीलच कशी ? माझं घर म्हणजे—

**धर्मा** : रागाऊ नग पोरी. इडा पिडा टळो– असं कंधी बी होणार नाय– पर बाई मी एक इचारतो, पोटच्या पोराला कुणी आई कधी भाईरचा रस्ता दावील का ?

**मंगला** : खरंच इडा पिडा टळो आणि असं कंधी घडू नये. तशी पाळी आली तर संपलंच म्हणायचं ! पण धर्मा, तू मात्र पुरतं ओळखलं नाहीस अजून मला. ( एकदम डाव्या हाताचे मनगट दाखवीत ) या भाजल्याचा खुणा, डोळे उघडून नीट पाहा.

**धर्मा** : ( पाहून चकित होऊन ) बाई– ह्यो ह्यो डाग—

**मंगला** : घर सोडायच्या वेळी मन कच खायला लागलं तेव्हा माझी मलाच शिक्षा केली होती मी.

**धर्मा** : पर बाई—

**मंगला :** जास्त बोलायचा विषय नाही हा. पण आंधळ्या मायेला माझ्या अंतःकरणात टिपूसभर थारा नाही, हे पक्कं लक्षात ठेव. तसा प्रसंगच आला तर—

**धर्मा :** म्या बी असाच ताट हुतो. लई लई भडक माथ्याचा हुतो. ह्यो ह्यो असल्या ताटपनापायीच माज्या हातानं उभ्या घरादाराचा म्या उनाळा केला. दोन वरीस हिंडलग्याला बी जाऊन खडी फोडून आलू. पर चाकरीसाटी हतं आलू आन ह्यो पोराच्या मायेत गुरपटलो. शानबाबूंची माय मराया टेकली तवा शामबाबू वरीस-भराचं बी नवतं. पर पोराच्या बापावर ठेवला नाय इकता इस्वास त्या माउलीनं ह्यो जेलखान्यात खडी फोडून आलेल्या धर्मावर टाकला. मरायच्या वख्ताला बाईनं पोर माज्या हाती दिलं आन म्हनाली, " धर्मा, पुरुषांचं काय बी खरं नाय. उद्या तुजं साब पुना लगिन करत्याल आन त्यंचा संसारबी व्हईल. पर या माज्या लेकराला संबाळणारा तुज्याविगर कोण्णी नाय. कोण्णीऽऽ नाय ! पोर ओटीत घे आन संबाळीन म्हनून शपत दे."

**मंगला :** ( व्याकुळ होत ) धर्मा—

**धर्मा :** माज्या गुनाच्या बये, मी शपथ दिली आन मर्दासारखा मर्द– तवापुन मी आई झालू. समदा ताटपना ह्यो पोरानं वाऱ्यागत झडपून नेला. ह्यो धर्माची पाट तवापून वाकली आन मान बी तवापून लवली !

[तेवढ्यात बाहेरून जाई "आई...आई..." अशी हाक मारीत धावत येते. तिने अंगातले कपडे बदललेले आहेत. पण चिप्प भिजलेल्या निथळत्या तोंडाने नि ओल्या हातापायाने आईसमोर पुसण्यासाठी येऊन ती उभी राहते.]

**मंगला :** हूं–याऽ! हक्काची सेवा करून घ्या. ( तिला जवळ घेऊन पदराने तिचे तोंड नि हातपाय पुशीत ) शंभर वेळां सांगितलं की टॉवेल घ्यावा आणि न्हाणीघरात जावं.

**जाई :** ऊंऽऽ ! आम्हाला नाही आवडत टॉवेल. तुझा पदर कसा मऊ मऊ उबदार आहे. हो की नाही रे धर्मा ?

**मंगला :** आता लहान बाळच पदरानं अंग पुसायला की नाही ? एवढी मोठी—

**जाई :** ( नक्कल करीत ) घोडी वाढलीस– तुला हे कसं कळत नाही ?

**मंगला :** ( हसत ) पुरे पुरे. लोकांच्या नकला करायचा गुण छान घेतला आहेस वडिलांचा. हातपाय धुवून ये म्हटलं तर अंग धुतल्यासारखी ओली होऊन आलीस.

**धर्मा :** सायबांनला बी ल्हानपणापुन पाण्याचा लई नाद. अजून बी कामावरनं परतलं की तासंतासं पोरागत पाण्यात डुंबत बसत्यात.

**जाई :** ( विस्मयाने ) खररंऽच का रे ?

**धर्मा :** अवं निगता निगत न्हाईत न्हाणीघराभाईर.

**जाई :** ( विलक्षण कौतुकाने ) होऽय ? तरीसुद्धा त्यांना कोण्णी फरपटत ओढून नेत नाही ? मग मज्जाच की !

**धर्मा :** मज्जा कसची डोस्क्याची ! मग बसत्यात आट आट दिस सटा सटा शिंका

येत नाय तर खाँक खाँक ख्वाकत !

**मंगला** : ( पुसणे आवरीत ) काय ग ठमाई—खोलीतून बाहेर कशी गेलीस ? दिसली नाहीस जाताना कुठे ती ?

**जाई** : अग खिडकीतून अंगणात उडी मारली मी. मोठी माणसं बोलत असली म्हणजे मध्ये येऊ नाही, असं तूच तर म्हणालीस !

**मंगला** : तेवढं बरं नेमकं आठवलं ! दांडोबा आहेस. हातपाय मोडले म्हणजे—

**जाई** : अग शाळेत याच्यापेक्षा उंचावरनं उड्या मारायला लावतात आमचे कवाइतीचे मास्तर.

**मंगला** : तेवढा अभ्यास छान चालला असेल तुझा !

**जाई** : आणि बरं का ग आई—

**मंगला** : आता आणखी काय राहिलं ' बरं का ग आई ? '

**जाई** : (एकदम रंगात येऊन, अभिनय करीत गाऊ लागते) सांगू ? आजपासून किनई—

**तू आहेस जाई, मी आहे आई**
**बरं का गं आई, हे विसरायचं नाही !**

**मंगला** : ( हसत ) होय का ? तू आई आणि मी जाई काय ?

**जाई** :
**सकाळ होताच मी तुला उठवीन,**
**मीच तुझे दात घासून देईन,**
**दुधाचा पेला पाहून रडायचं नाही !**
**— बरं का गं आई हे विसरायचं नाही !**

**मंगला** : ( हसत ) अस्सं ! अस्सं ! आणि मग— ?

**जाई** :
**अभ्यास झटपट करून घ्यायचा,**
**देइन तो झगा घालून घ्यायचा,**
**शाळेला जाताना रुसायचं नाही !**
**—बरं का गं आई हे विसरायचं नाही !**

**मंगला** : ( हसत ) आणखी नाही का काही ?

**जाई** :
**संध्याकाळी मी फिरायला जाईन,**
**प्रसादजवळ तुला खेळायला ठेवीन,**
**दोघांनी मुळीच भांडायचं नाही !**
**—बरं का गं आई हे विसरायचं नाही !**

**मंगला** : ( हसत ) बरं बरं— पुढे ?

**जाई** :
**शुभं करोति, पावकी नि पाढे**
**म्हणून दाखवायचे नेमाने तेवढे**
**पाढयांवाचून तू जेवायचं नाही !**
**— बरं का गं आई हे विसरायचं नाही !**

**मंगला :** (हसत) समजलं हो. थांब– रात्री झोपायच्या वेळी ये माझ्या पुढ्यात म्हणजे—

**जाई :** ऊं हूं ! ऊं हूं !

**झोपताना मात्र तू आई व्हायचं,**
**अंगाई म्हणत थोपटत राह्यचं,**
**दुपारचं काही आठवायचं नाही**
**— बरं का गं आई हे विसरायचं नाही !**

**मंगला :** (हसू आवरीत) पुरे पुरे ! जेवायला बसायचं की गाण्यानंच पोट भरणार आहे ?

**धर्मा :** (कौतुकाने) लई लई हुषार हैती छोट्या ताई.

**मंगला :** तेवढ्यातच सगळी हुषारी उतू चाललीय. अरे कुठली कुठली गाणी रचते आणि-

**जाई :** अगं मी नाही रचलं हे गाणं. मी गाण्यातली नुसती नावं बदलली. आई, हे गाणं कुणी केलंय सांगू का—

**मंगला :** काही नको. तुझ्या गप्पा पुरे झाल्या. आपलं पान मांडून घ्यायचं नाही का बाईसाहेब ?

**जाई :** (जीभ चावत) विसरलेच की— ! (पाट मांडून घेते आणि शेल्फातील ताट काढता काढता चुलीवर नजर जाऊन थबकून) आज तुझा उपास आहे आई ?

**मंगला :** हो, का ?

**जाई :** (तोंडाला पाणी सुटल्याप्रमाणे 'स्सूक' करीत). खिचडी ऽ ! साबूदाण्याची खिचडीऽ ?

**मंगला :** समजलं ! आपल्यासाठी वाटा ठेवलाय बरं खिचडीचा. त्याशिवाय मला कशी पचायची ? आता आधी जेवण आटोपा नि मग—

**जाई :** आई, मी नुसती खिचडीच खाल्ली तर चालेल का ?

**मंगला :** का ?

**जाई :** मला नाही जेवायचं ! मी नुसतीच खिचडी खाईन.

**मंगला :** जेवायचं नाही ऽऽ ?

**जाई :** अगं भूकच नाही मला !

**मंगला :** कशाला असेल ? डबा हादडला असेल सगळा. (तिचा डबा उचलून उघडीत) सकाळच्या शाळेला डबा घेऊन जाऊ नये म्हटलं तर—

**जाई :** अग डबा काही मी खाल्ला नाही—

**मंगला :** तू नाही खाल्लास तर काय तुझ्या बाईंनी फस्त केला ? चट्टामट्टा तर केलेला दिसतोय आणि—

**जाई :** अग मी नाहीऽऽ ! आपले बाबा गऽ—

**मंगला :** (विस्मयाने) बाबा ? बाबांनी तुझा डबा...छे काही तरीच !

**जाई :** खर ऽ रंच ग ऽ ! विचार धर्मीला. ए, बाबांनी माझ्या डब्यातली भाकरी मागून घेऊन खाल्ली की नाही रे ?

**मंगला :** मागून घेऊन खाल्ली ?

**जाई :** हो. म्हणाले—अग तुझ्या आईच्या हातची भाकरी मी किती तरी दिवसांत खाल्ली नाही. एक ग्रास खायचे नि म्हणायचे—ओफ् ! पुन्हा घास खायचे, मग म्हणायचे " वा वा ! " आणखी एक घास खायचे नि—

**मंगला :** पुरे पुरे. हरभऱ्याची झाडं छान लावता येतात तुझ्या बाबांना. तू काय काय खाल्लंस बाबांच्या घरी ?

**जाई :** कोको प्यायले. बिस्किटं खाल्ली. कॅडबरीचं चॉकलेट खाल्लं—झालंच तर—

**मंगला :** झालं ! मग कसल्या जेवणार बयाबाई आपण आता ?

**जाई :** म्हणून तर म्हणते. बशीत मला थोऽडीशी खिचडी काढून दे म्हणजे झालं. वर खोबरं घालायचं हं.

**मंगला :** मग घटकाभरानं आईच्या भोवती भूक भूक करीत पुन्हा नाचायला तयार ! ( चुलीवरच्या पातेल्यातून एका बशीत खिचडी काढीत ) ये तर आता चार वाजल्याशिवाय ' भूक ' करीत घरात, म्हणजे—

**जाई :** तंगडीच मोडते.

**मंगला :** ( हसू आवरीत मोठे डोळे करीत ) जाई ऽ ऽ ऽ !

**जाई :** ( बशी घेऊन तोबरा भरीत डोळे मिटून चघळीत शामकांतांच्याप्रमाणे ) ओफ ! ( पुन्हा घास घेत ) वा वा ! ( आणखी एक घेत बाबांच्याप्रमाणे उजव्या हाताचा अंगठा नि शेजारचं बोट यांचं वर्तुळ करून प्रशस्तीदाखल नाचवीत ) वा ऽ !

**मंगला :** ( हसू अनावर होत ) पुरे पुरे हं जाई ! तुला अगदी कोणाकडं पाठवायची सोय नाही.

**जाई :** ( खाता खाता— ) आई— बाबांच्या घरी आम्ही खूप खूप मज्जा केली !

**मंगला :** मज्जा म्हणजे धावला असाल, नाचला असाल— घर डोक्यावर घेतलं असेल. तिथं कोण बोलणार तुम्हाला ?

**धर्मा :** त्ये काई इचारू नगा. पोरापरीस पोर होऊन ताईंच्यासंगं धुमाकूळ घातला सायबांनी.

**जाई :** आणि बरं का आई— बाबांना मी चांऽगले अंगठे धरून उभं केलं आज !

**मंगला :** ( थक्क होत ) अंगठे धरून ? तू ऽ ? बाबांना ?

**जाई :** अग बूट घालून घरात आले होते, दाढीचं सामान तस्सं टाकलं होतं टेबलावर, चहाचा कपदेखील विसळला नव्हता आपला आपण. तू पाहिलं असतंस तर धबाधबा दणकेच घातले असतेस !

**मंगला :** फारच शिष्ट झाली आहेस हो जाई तू !

**जाई :** अग म्हणजे तुझ्यासारखं अगदी पाठ दुखायला लागेपर्यंत नाही ग मी त्यांना

उभं केलं. अगदी थोडा वेळ !

**मंगला** : समजलं ! म्हणून काय झालं ? बाबा तुझ्याएवढे आहेत होय ?

**जाई** : अहा– मग काय तुझ्याएवढे आहेत ?

**मंगला** : माझ्यापेक्षा मोठे आहेत ते– समजलीस ?

**जाई** : ( ठाम खात्रीने ) काही तरीच ! मोठी माणसं लहान मुलांशी कधी असा दंगा करतात वाटतं ? तू माझ्याशी कधी अशी खेळतेस ?

**मंगला** : बरंच कळायला लागलं की तुला ?

**जाई** : आई– बाबा आपल्या घरी राहात होते त्या वेळी फार दंगा केला का ग त्यांनी— ?

**मंगला** : काऽऽ ?

**जाई** : सांग ना ? दंगाच केला नं त्यांनी ? मला आहे ठाऊक. तुला उलटूनसुद्धा बोलले. मला आहे माहीत !

**मंगला** : पण कशावरून ?

**जाई** : म्हणून तू त्यांच्याशी कट्टी घेतलीस. खरं की नाही ? म्हणाले बाबा मला !

**मंगला** : काय म्हणाले ?

**जाई** : म्हणाले– तुझ्या आईनं माझ्याशी बोलणंच टाकलंय !

**मंगला** : हूं ! बापलेकीत बरंच बोलणं झालेलं दिसतंय ! आणखी नाही का काही म्हणाले ?

**जाई** : आई– देवापुढं नाक घासून बाबा चुकलो म्हणाले तर ?

**मंगला** : तर काय ?

**जाई** : तरीदेखील घरात घेणार नाहीस तू त्यांना ?

**मंगला** : ( व्याकळून ) जाई—

**जाई** : तसे चांगले आहेत ग आपले बाबा. मी सांगीन त्यांना नीट समजावून.

**मंगला** : तू ? तू काय सांगशील ?

**जाई** : आईनं सांगितलेलं ऐकायचं, तिला कधी उलटून बोलायचं नाही, झालंच तर–

**मंगला** : इतकं सोपं असतं ते तर आणखी काय हवं होतं मला ?

**जाई** : बाबांना फार फार यावंसं वाटतं ग आपल्या घरी, हो की नाही रे धर्मा ?

**धर्मा** : तर काय जी ?

**मंगला** : अग राजवाड्यासारखं तुझ्या बाबांचं घर आणि राजासारखा त्यांचा थाटमाट. त्यांना का आपलं घर आवडायचंय ?

**जाई** : न आवडायला काय झालं ? माझं हे फडताळ मी देईन त्यांना.

**मंगला** : फडताळात जाऊन बसणार आहेत वाटतं तुझे बाबा ? अग त्यांचे बूटसुद्धा मावायचे नाहीत तुझ्या फडताळात. त्यांना हवं ते या घरात काऽही मिळायचं नाही.

**जाई** : मग... मग आपण जाऊ या की त्यांच्या घरी ?

**मंगला** : आपण ? त्यांच्या घरी ? इतकं आवडलं त्यांचं घर तुला ?

**जाई** : ( उत्साहाने ) ग किती छान आहे म्हणून सांगू ! अंगण केवढं मोठं आहे; चिक्कूचं झाड आहे; पेरूचं झाड आहे; झालंच तर बाबा आम्हाला सीसॉ करून देणार आहेत; झोपाळा बांधून देणार आहेत आणि—

**मंगला** : सगळा करारच करून आलीस वाटतं बाबांशी !

**जाई** : ( खाणे आटोपून उठत ) अग किनई, बाबा मला आज घरी जाऊच नको म्हणत होते.

**मंगला** : ( तिच्या समोरील बशी उचलत असता दचकून ) काऽय ?

**जाई** : हो की नाही रे धर्मा ? मला म्हणाले तू इथंच राहा आता. मी तुला हव्वं ते देतो. माझी वेणीसुद्धा घालतो म्हणाले.

**मंगला** : ( खर्रकन् मुद्रा बदलते. ) असं म्हणाले तुला ते ? धर्मा—

**धर्मा** : ( गोंधळून ) त्ये काय बी खरं नाय बाई !

**मंगला** : ( तीव्रपणे ) जाई खोटं सांगतेय ?

**धर्मा** : नाय, तसं खोटं नाय पर—

**जाई** : प्रसादलासुद्धा आणू या म्हणाले तिथं. होय की नाही रे धर्मा ?

**मंगला** ( कडाडत ) आणि तू हुरळून गेलीस लागलीच ?

**जाई** : ( गोरीमोरी होत ) न...नाही...मी नाही म्हणाले त्यांना.

**मंगला** : खरं सांगतेस ? तू ' नाही ' म्हणालीस त्यांना ?

**जाई** : विचार हवं तर धर्माला. मी म्हटलं की आईलासुद्धा आणू या इथं, तर—

**मंगला** : ( तिरस्काराने ) एक सोडून शंभर आया आणून देतो म्हणाले नाहीत का तुला ते ?

**जाई** : न...नाही...खरऽरंच नाही ग...

**मंगला** : काही सांगू नकोस तू मला. त्यांचीच मुलगी तू.

**जाई** : ( अजीजीने ) माझं– माझं काय चुकलं आई ?

**मंगला** : कुणाचं काही चुकलं नाही. माझंच चुकलंय सगळं, तोंडाकडं काय बघत उभी राहिलीस ? आचवायचं नाही ? ( जाई गोरीमोरी होऊन बाहेर जाते. ती गेल्यावर धर्माकडे वळून—-) मुलांना घेऊन जाण्यासाठी आला होतास तू धर्मा ?

**धर्मा** : देवाच्यान् सांगतो– न्हाय बाई. तसली वंगाळ गोष्टी कदीबी घडणार न्हाय ह्या धर्माच्या हातून.

**मंगला** : आता मुलांना फितवण्याचा उद्योग चालला आहे तर त्यांचा ? एवढ्यासाठी मी मुलांना त्यांच्या घराची पायरी चढू देत नव्हते, समजलास !

**धर्मा** : सायबांच्या मनात बी तसलं काय नाय. उगाच म्हनालं असत्याल पर त्येंचं त्यांना ठावं हाय—

**मंगला** : उगाच नाही बोलायचे. बायकोवर सूड घ्यायची तेवढीच एक गोष्ट बाकी

उरलीय त्यांच्या हाती. त्यांना बजावून सांग की असला काही प्रकार करणार असलात तर—

**धर्मा** : न्हाय बाई, तुमच्या पोराबाळांना कोण्णी हात लावनार नाय. मी जिता हाय तोवर असलं काय बी होऊ देनार न्हाय.

**मंगला** : माझा आता कोणावरच विश्वास नाही.

**धर्मा** : तसं नग—छोट्या ताइसायबांनलाच इचारा तुमी की धर्मा हितं इकत्या उनाचं कशापाई आला हुता—(तेवढ्यात जाई दबकत दबकत परत येते.)

**मंगला** : कशासाठी आला होतास ?

**धर्मा** : इचारा तुमीच. ताई, सायबांनी मला तुमच्यासंगं कशापाइ धाडलं त्ये सांगा बरं बाइसायबान्ला.

**जाई** : (चाचरत) म...मला भीती वाटली तुझी. मी...मी म्हटलं बाबांना की मी...मी इथं आल्याचं कळलं तर आई मला मार देईल.

**मंगला** : म्हणून रदबदली करण्यासाठी त्यांनी धर्माला धाडला ?

**जाई** : ते चिठ्ठी देणार होते तुला. पण...पण (घुटमळते.)

**मंगला** : पण काय ? सांग. आता काही लपवालपवी करू नकोस.

**जाई** : आई, त्यांची चिठ्ठीसुद्धा न वाचता फाडून टाकली असतीस का ग तू ?

**मंगला** : असं म्हणाले ते ?

**जाई** : म...मला नाही ग— धर्माला म्हणाले.

**धर्मा** : बाई, शामबाबूंनी माज्यासंगं निरोप दिलाया तुमाला.

**मंगला** : निरोप ?

**धर्मा** : म्हनाले, तिला सांग—

[तोच पावले वाजतात आणि दारात शामकांतच येऊन उभे राहतात, त्यांना बघताच धर्मा उठून उभा राहतो आणि जाई उचंबळून—' बाबा—तुम्ही...तुम्ही आलात ? ' असे ओरडत त्यांना बिलगण्यासाठी धावते, पण दोन पावलांवरच थबकते. वळून आईच्या मुद्रेवरील भाव पाहून थिजल्यासारखी होते. शामकांतांना दाराशी पाहताच मंगला भडकते. प्रक्षोभाने थरथर कापू लागते. आणि क्षणार्धातच शामकांतांच्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकून ताड्कन् पाठ फिरवून आतल्या खोलीत ती निघून जाते. तेवढ्या अवमानाने शामकांत घायाळ होतात. उंबऱ्यातच दाराचा आधार घेऊन थबकतात आणि—]

**शामकांत** : (विव्हलतेने) का ? मला पाहताच ही आत निघून का गेली ? तिच्या घराचा उंबरठा विटाळण्यासाठी मी इथं आलो असं वाटलं का तिला ? धर्मा— माझा निरोप सांगितला नाहीस तू तिला ?

**धर्मा** : त्येच सांगत व्हतो बाईसायबांनला मी धनी. पर—

**शामकांत** : (काळजीने पण हळूच) मारलं बिरलं नाही ना जाईला तिनं ?

**जाई** : नाही बाबा.
**शामकांत** : मग तू अशी मलूल का पोरी ? रागावली ती तुला ?
**जाई** : छे, मुळीसुद्धा नाही.
**शामकांत** : (हर्षाने) खररंच ?... खरंच सांगतेस तू पोरी ?
**जाई** : अगदी खरं बाबा—!
**शामकांत** : (दाराच्या फळीवर मान टेकत सुटकेचा मोठा निःश्वास टाकीत) ओ गॉड !
**जाई** : तुम्ही बाहेर का उभे ? आत या ना बाबा—!
**शामकांत** : नको ! बस् बस्–एवढंच हवं होतं मला. तेवढ्याचसाठी आलो होतो मी. पुन्हा नाही कधी येणार हं– आईला सांग.
**जाई** : संध्याकाळी पार्कमध्येसुद्धा—?
**शामकांत** : तिथं येईन पोरी...पण तुझ्या आईची परवानगी असेल तर भेटेन तुला... नाही तर नुसतं दुरून बघून जाईन.
**धर्मा** : शामबाबू—
**शामकांत** : पुन्हा अशी विषाची परीक्षा नको.

[शामकांत पाठ वळवून घायाळ मनाने जातात. त्यांच्या मागोमाग जाई 'बाबा बाबाऽ' अशी हाक मारीत जाते. क्षणार्धातच मंगला प्रवेशते– बहुधा काही वेगळ्याच मनःस्थितीत—]

**मंगला** : (चकित होत थबकून) हे काय ? गेले ?
**धर्मा** : (जाण्याच्या तयारीने उठत) हां बाई– गेले शामबाबू !
**मंगला** : (मुद्रा झरझर पालटते. अगतिक विव्हल दिसू लागते. पहिल्यांदाच इतका वेळ राखलेले सगळे उसने अवसान ओघळू लागते आणि–) मला बोलायचं होतं त्यांच्याशी.
**धर्मा** : लई उशीर केलात आपुन.
**मंगला** : (मन आवरीत क्षणार्धाने) कसला निरोप आणला होतास तू त्यांचा ?
**धर्मा** : (दाराशी जात) म्हणाले– बाईनला सांग, माज्या अपराधाचं परायश्चित्त मी भोगतुया–जलमभर म्या त्येच भोगनार हाय, पर त्येची शिवशा माज्या जाईला करू नकोस— !
**मंगला** : (विव्हलतेने) धर्मा–[धर्मा पाठ वळवून निघून जातो. मंगला क्षुब्ध होऊन तशीच उभी राहते. तोच जाई उत्साहाने 'आई आई' अशी हाक मारत प्रवेशते आणि–)
**जाई** : (उत्साहाने) अग संध्याकाळी पार्कमध्ये येतो म्हणाले बाबा. (तोच आईची प्रक्षुब्ध मुद्रा पाहून पुन्हा थिजत–) पण आई, तुझी परवानगी असली तर जाईन हो मी. (क्षणार्ध वाट पाहून) नाही तर नाही जायची, खररंच...खररंच सांगते ग...

**मंगला** : ( मनाचे सगळे बांध फुटत तळव्याने तोंड झाकून हुंदका देत– ) जाई–जाई, तुझी आई इतकी दुष्ट आहे का ग ?

( या प्रश्नाबरोबर जाई आईला मिठी मारून बिलगते आणि त्याच वेळी– )

**प ड दा**

# अंक तिसरा

[ त्याच दिवशी संध्याकाळी सहा वाजण्याचा सुमार. उन्हे मावळतीकडे कलली आहेत. पार्कमधील एक नयनरम्य हिरवळीचा निवान्त कोपरा. दूरवर बालगोपाळांचा गलका चालू आहे. लांबून कोठून तरी बँडची मधुर सुरावट पार्श्वसंगीतासारखी अस्पष्टपणे ऐकू येत आहे. सभोवताली विविध प्रकारच्या रंगीबेरंगी फुलांनी डवरलेले ताटवे. मागे कोपऱ्यात एक मर्क्युरी लँपचा खांब व खांबावर न लागलेला दिवा. मध्यभागी एक बाक आहे. पण बाकापेक्षाही जमिनीवरच बैठक मारावी असा मोह व्हावा इतकी सुंदर लुसलुशीत हिरवळ आहे.

पडदा वर जातो त्या वेळी थाटामाटाच्या विशेष पोशाखात शामकांत बाकाच्या पाठीवर रेलून किंचित पाठमोरे उभे आहेत. सिगरेटचे झुरके घेत, अस्वस्थतेने कुणाची तरी वाट बघत, विचार करीत, मधूनच घड्याळात डोकावत तर क्षणाक्षणाने डोळे ताणून दूर न्याहाळत– असे उभे आहेत. क्षणाभरातच शामकांत कंटाळतात, सिगरेट पुरती संपलेली नसतानाही चिडून खाली आपटतात व पायाने घासून विझवतात. मग इकडे तिकडे बघत बाकाशेजारी हिरवळीवर चक्क पाय पसरून बसतात. कसली तरी याद येऊन शीळ घालीत खिशांतून बऱ्याचशा चिठ्ठ्याचपाट्या काढतात. त्यांतच एक निळसर पाकीट. निळे पाकीट निवडून बाकीचे कागद परत खिशात कोंबतात. पाकिटातील गुलाबी पत्र काढून पुन्हा वाचतात. मुद्रा फुलून येते. रंगेलपणे मध्येच पत्राचा वासही घेतात. विशेष लाडात येऊन एकदा त्या पत्राचे चुंबन घेऊन–तेवढ्यात उगीचच दचकतात. कुणी पाहिले तर नाही ?– अशा चोरट्या भावनेने आजूबाजूला चाहूल घेतात. लगबगीने पत्राची घडी करून पाकिटात घालून पाकीट पुन्हा खिशात कोंबतात. मग सिगरेट केस काढून त्यातील सिगरेट शिलगवतात. हवेत धूम्रवलये सोडू लागतात. मध्येच झटका आल्याप्रमाणे खिशात कोंबलेले पत्र पुन्हा बाहेर उपसतात आणि क्षणाचाही विचार न करता तिरस्काराने फाडून टाकतात आणि चुरगळून बोळा करीत तो बाकापलीकडे भिरकावतात. मग क्षणभर त्या भिरकावलेल्या बोळ्याकडेच बघत विचार करीत राहतात. पुन्हा उठतात, जवळ जाऊन वाकून तो बोळा उचलतात आणि टोकाशी जाऊन

दगड फेकावा तसा तो बोळा सर्व शक्तीनिशी दूर दूर फेकतात. जणू तो बोळा पुन्हा म्हणून हाती लागू नये, दिसूदेखील नये. मग हात झटकीत ते सहज मागे वळतात तो समोर धर्मा उभा. त्याला तसा उभा पाहून प्रथम दचकून— मग हसून—]

**शामकांत** : ओं—गॉड ! तू होय ? मला वाटलं—

**धर्मा** : लताबाई आल्या ?

**शामकांत** : लता ? नॉन्सेन्स ! तू तरी शहाण्याचा कांदा आहेस ! गाढवा, लता मला भेटायला इथं पार्कमध्ये कशाला येईल ? ती गुंतली असेल आपल्या वाढदिवसाच्या पार्टीच्या तयारीत. मी या पोरीची वाट बघत होतो.

**धर्मा** : छोट्या ताई ?

**शामकांत** : हो, छोट्या ताई– जाई. नाही तर कोण— स्टुडियोतल्या पोरी समजलास ?

**धर्मा** : आता मला काय ठावं ? त्येनला बी ' पोरीच ' म्हनता की आपुन !

**शामकांत** : (दटावीत) हेच—हेच तिन्ही त्रिकाळ सगळीकडं बोंबलत जा ! अगदी चव्हाट्यावर मांडून ठेव माझी अब्रू ! तू इथं कशाला रे तडफडायला आलायस ? बंगल्यावर तुला थांबायला सांगितलं, तर—

**धर्मा** : थितच बसलो हुतो, पर फोन आला—

**शामकांत** : (कमालीची उत्सुकता दर्शवून) फोन आला ? पुन्हा फोन आला ? लताचा ?

**धर्मा** : हां जी—लताबाईंचा !

**शामकांत** : तू सांगितलं नाहीस तिला ?

**धर्मा** : बंगल्यावर नाय आपुन म्हणून मी सांगितलं, पर—

**शामकांत** : (खुषीत) ती काहीएक ऐकायला तयार नाही—होय ना ?

**धर्मा** : हां जी ! आपुन आल्याबिगर पार्टी होनार नाय म्हनाल्या.

**शामकांत** : (चुकचुकत) हाउ इज इट पॉसिबल ? कसं शक्य आहे ते ?

**धर्मा** : जायाच होवं !

**शामकांत** : अरे पण जाईच्या ताब्यांत मी एकदा सापडलो म्हणजे ती मला सोडणार आहे होय ?

**धर्मा** : (जोरात) ते मला काय बी ठावं नाय. साताच्या ठोक्याला आपुन तत हजर पाहिजे म्हंजी पाहिजे !

**शामकांत** : ऑं ऽ ? पण तू का एवढा अटीतटीनं मला दम भरतो आहेस ?

**धर्मा** : असं लताबाई म्हनाल्या, फोनवर. त्ये सांगतूय मी.

**शामकांत** : कळलं मला !

**धर्मा** : आता आपुन जा नाय तर नका जाऊ, मला काय त्येचं—?
**शामकांत** : बरोबर आहे ! तुला काय त्याचं सोयर सुतक ?
**धर्मा** : न्हाय—तसं सोयर बी हाय नि सुतक बी हाय. पर— (घुटमळत) मानला तर बाप, न्हाय तर 'गणबा' काय आन 'गण्या' काय– योकच की ...
**शामकांत** : बरं बाबा, तू माझा 'गणबा' ! बोला गणपतराव, काय कळवायचं लताबाईंना ?
**धर्मा** : माजं ऐकनार आपुन ?
**शामकांत** : मग तुला 'गणपतराव' केला कशासाठी ?
**धर्मा** : मग लताबाईंनला शाप सांगून लावतू—
**शामकांत** : ऐकू दे—
**धर्मा** : शामबाबू काइ येनार न्हाइती, पुना भेटणार बी न्हाइती– त्येंच्या नाहीं लागू नगा.
**शामकांत** : आणि कोणाच्या नादी लागा ?
**धर्मा** : त्येना काय वं– रग्गड मोटरवाली मानसं मिळत्याल की !
**शामकांत** : फोनवर तेदेखील सांगून टाक !
**धर्मा** : सांगतू मंजी ? मला भ्या हाय व्हय कोनाचं ?
**शामकांत** : म्हणजे स्टुडियोत उद्या माझी बिनपाण्यानं—
**धर्मा** : पगा तर ह्यो धर्माची करामत. पार निक्काल लावतू. बया पुना कंदी फिरकायची नाय बंगल्याकडं अशी जाम करतू (जाऊ लागतो तोच—)
**शामकांत** : थांबा थांबा—अहो गणपतराव, घाईनं निघालात कुठं ? पुरता विचार केला नाहीत आपण.
**धर्मा** : समदा इचार केलाया मी—
**शामकांत** : काय विचार केलात ? बाईंना तुम्ही जाम कराल– नाही, अगदी निक्काल लावाल. पण पुढं काय होईल माहीत आहे ?
**धर्मा** : काय बी आकांत व्हनार नाय !
**शामकांत** : आकांत ? अरे प्रळय माजेल प्रळय. सहा महिने नाकदुऱ्या काढाव्या लागतील मला—ठाऊक आहे ?
**धर्मा** : (मिस्किलपणे हसून) छा छा, भलतंच ?
**शामकांत** : काय– 'छा छा' काय ? खोटं नाही सांगत मी तुला—
**धर्मा** : सा महिनं मंजी लई जालं !
**शामकांत** : (न समजून) काय 'लइ जालं' ?
**धर्मा** : सा महिन्यांत ध्या बायांशी सोयरीक पटून मोडत्याल आपल्या !
**शामकांत** : (डोळे वटारत) धर्मा—
**धर्मा** : बगा गण्याचा गणपतराव केलात आपुन म्हणून जीब मोकाट सुटली. पर योक

अंदाज सांगितला.

**शामकांत** : अंदाज ? बरेच अंदाज करता यायला लागले की तुला !

**धर्मा** : त्येबी आपलीच किरपा !

**शामकांत** : ( सर्द होत ) बरं बरं, समजलं मला ! (क्षणार्धात पुन्हा हसून ) तेव्हा गणपतराव—

**धर्मा** : मी आपला ' गण्या 'च हाय तो टीक !

**शामकांत** : तसं नव्हे रे गणपतराव—वुइथ ड्यू रिस्पेक्ट टु यू—

**धर्मा** : काय म्हनाला ?

**शामकांत** : म्हणजे तुझ्या सल्ल्याबद्दल योग्य आदर दर्शवून मला असं म्हणणं भाग आहे की—आपली उपाययोजना फार जालीम—म्हणजे फारच अघोरी आहे !

**धर्मा** : आता रोगच चिवट हाय, त्येला औषधपानी बी तसं जालीमच कराया हवं की !

**शामकांत** : मोठा डॉक्टर लागून गेलास ! अरे माझ्या सोन्या, तुझ्या लक्षात कसं येत नाही ? तू हवं ते सांगितलंस तरी ती मुळीच विश्वास ठेवायची नाही तुझ्या शब्दांवर. मी इथं आहे कळलं तर येऊन ओढून घेऊन जाईल ती मला—ठाऊक आहे ?

**धर्मा** : त्ये तर बाई फोनवरच मला म्हनाल्या—!

**शामकांत** : तू सांगितलंस वाटतं तिला मी पार्कवर गेलोय म्हणून ? केलास घोटाळा ?

**धर्मा** : आता कुना कुनाला काय सांगायचं आन काय सांगायचं न्हाय ते मला कसं उमगावं ? इच्यारलं तवा सांगितलं.

**शामकांत** : अरे पण मी तिला सांगितलं होतं की—

**धर्मा** : ( ओरडून ) ते समदं खोटं ! एकदम लबाड ! त्येत काय बी अर्थ नाय—

**शामकांत** : ऑ ऽ ?

**धर्मा** : असं बाई म्हनाल्या फोनवर. आता मी तरी लबाड कुटवर बोलनार ?

**शामकांत** : चांगलं केलंस, बाबा, चांगलं केलंस !

[ शामकांताची मुद्रा बावचळून जाते. केसात हात घालून शीळ घालीत ते येरझारा घालू लागतात. त्यांच्या मुद्रेकडे धर्मा रोखून पाहू लागतो. मध्येच तो खुदकन् हसतो.]

**शामकांत** : (चमकून) का रे ? हसायला काय झालं ?

**धर्मा** : काय नाय जी !

**शामकांत** : तरी पण ? उगाच नाही हसायचास तू ?

**धर्मा** : काय नाय—पर इचार करतूया की शामबाबू येक हैत, का दोन हैत, का—

**शामकांत** : गाऽढवाऽ ! तुला ' गणपतराव ' केला म्हणून तू माझं मनोविश्लेषण करायला लागलास होय ?

**धर्मा** : नाय बा—मला पुरं ठावं हाय—मी आपला ' गण्या 'च !

**शामकांत** : गण्या ?

**धर्मा** : तर ? फुकाचा शबुद बोलून कुनी राजा बनतुया ?

**शामकांत** : रागावू नकोस रे माझ्या राजा––

**धर्मा** : (धुस्शात) काइ 'राजा' म्हनू नगा आन सोन्या म्हनू नगा ! पायरी संबाळून दाराशी मी हुभा हाय तो ठीक ! (जाऊ लागतो, त्याबरोबर शामकांत भडकतात.)

**शामकांत** : (उसळून) तुझी तरी कमालच आहे धर्मा. आमंत्रणाला उत्तर देण्याची ही काय रीत झाली ? माणसं मोठ्या कौतुकानं वाढदिवस साजरा करतात; प्रेमानं आप्तेटांना मेजवानीसाठी बोलावतात–आणि त्यांना म्हणे तिरसटासारखी उत्तरं देऊन झिडकारून लावा. अरे काय मॅनर्स, एटिकेट आहेत की नाहीत ? अरे मला काय सैतान समजलास तू ?

**धर्मा** : लताबाईनला जबाब काय देऊ तेवडं सांगा.

**शामकांत** : तिला सांग, पार्टीच्या वेळेपर्यंत मी येतो म्हणून. नाही तर थांब–तिला सांग ! काय सांगशील ? ऊंऽऽ–– (घुटमळतात.) तिला असं सांग की––

[तेवढ्यात मागून चोरपावलाने जाई येते आणि शामकांतांचे गच्च डोळे झाकते.]

जाई...जाई...जाई ! ओळखलं मी.

**जाई** : (हसत डोळे सोडत) कसं ओळखलंत हो ?

**शामकांत** : अग तुझ्याशिवाय माझ्याशी असली थिंगामस्ती कोण करणार ?

**जाई** : आपला प्रसाद नाही का करीत ?

**शामकांत** : त्याचे हात ओळखतात मला. आणि काय ग, त्या गुलामाला नाही आणलास ?

**जाई** : तो तिकडं फुलराणीत बसायला गेलाय.

**शामकांत** : एकटाच ?

**जाई** : एकटाच कसा ? आई आहे की त्याच्याबरोबर !

**शामकांत** : (नाटकीपणाने) तुझी आई आलीय का इथं ? हरे राम !

**जाई** : इतकं काही घाबरू नका– अहो आईनं परवानगी दिलीय मला.

**शामकांत** : सांगितलं कोणी तुला, मी तुझ्या आईला घाबरतो म्हणून ?

**जाई** : अॅहॅं ! अॅहॅं ! मग दुपारी कशी तिरपीट उडाली होती एका माणसाची ?

**शामकांत** : कोणाची ? माझी ?

**जाई** : आणि पळालं कोण लांब लांब ढांगा टाकीत ?

**शामकांत** : लांब लांब ढांगा टाकीत मी पळालो ?

**जाई** : नाही तर काय मी पळाले ?

**शामकांत** : (सारवासारवी करीत) ते दुपारचं ना–अग त्याची काय गंमत झाली–

**जाई** : हाका मारल्या तर मागं वळून पाहायलादेखील तयार नाही.

**शामकांत** : बरं बुवा, घाबरलो मी– कबूल, अगदी तिरपीट उडाली होती माझी.

**जाई** : थांबला का नाहीत हो ? आईला कित्ती वाईट वाटलं—
**शामकांत** : (विस्मयाने) आईला– वाईट वाटलं ?
**जाई** : आईला रडू आलं की !
**शामकांत** : आईला...रडू...? छे, शक्यच नाही.
**जाई** : आईला इतके घाबरता बाबा तुम्ही ?
**शामकांत** (मिस्किलपणे) अग त्या चंडिकेला कोण घाबरणार नाही ?
**जाई** : अँ ऽ ऽ ? आईला चंडिका म्हणता ?
**शामकांत** : (हसत) चंडिका म्हणू नको तर काय चांदबिबी म्हणू ?
**जाई** : चांदबिबी ? आईला चांदबिबी म्हणतात का ?
**शामकांत** : ए महामाये– अग चेष्टा बरं का– नाही तर आईला जाऊन सांगशील की—
**जाई** : सांगशील म्हणजे ? सांगतेच– मलादेखील महामाया म्हणता काय ?
**शामकांत** : (उठून तिच्यापुढे कान उपटून हात जोडत) चुकलो, चुकलो. पुन्हा नाही कधी म्हणणार. झाली आता भरपाई ?
**जाई** : (शिष्टपणाने) मोठ्या माणसांना असं म्हणायचं का ?
**शामकांत** : मोठी कोण ? तुझी आई ?
**जाई** : मग ? आई मोठी, मी मोठी—
**शामकांत** : प्रसाददेखील मोठा. लहान फक्त मीच. कोणी शिकवला हा हिशेब आजीबाई तुम्हाला ?
**जाई** : आम्हाला ठाऊकच आहे मुळी.
**धर्मा** : शामबाबू—
**शामकांत** : अरे तू अजून इथंच उभा ?
**धर्मा** : लताबाईनला निरोप सांगणार हुता आपुन.
**शामकांत** : (त्रासिक अधीरतेने) अरे त्यात काय सांगायचंय ? दे काही तरी सांगून. लाव पिटाळून ! आता काही मला जाणं शक्य नाही. हूं– मग जाई—
**धर्मा** : त्ये न्हाई चालायचं. लताबाई हित्तं येत्याल.
**शामकांत** : (एकदम उसळून त्याच्या अंगावर धावून जाऊन त्याचे खांदे धरून त्याला गदागदा हालवीत– ) नॉन्सेन्स ! तू मला काय समजलास रे ? मी काय तिचा गुलाम आहे होय ? विकत घेतलाय तिनं मला पैशानं ? माझा मी स्वतंत्र नाही ? मी हवं तिकडं जाईन ! हवं ते करीन ! ती कोण मला सांगणार ? येत नाही ! येणार नाही म्हणून सांग.
**धर्मा** : पगा बरं— अस्सा निरुप द्यायाचा ना ?
**शामकांत** : हो हो, अस्साच द्यायचा. तिची मिजास मला सांगतोस ? अशी ती कोण चांदबिबी लागून गेलीय ?

**जाई :** कोण हो बाबा ही दुसरी चांदबिबी ?

**शामकांत :** ( गडबडून ) चांदबिबी ? हा हा चांदबिबी ! आपली चांदबिबी गऽऽ... म्हणजे ती ही... आहे अशीच एक चांदबिबी !

**जाई :** तुमच्या सिनेमात ?

**शामकांत :** हो हो, सिनेमातच !

**जाई :** ती काय करते तुम्हाला ?

**शामकांत :** ( वैतागाने ) बसते माझ्या टाळक्यावर !

**जाई :** ( शब्दशः खरे मानून ) टाळक्यावर बसते ? ( बाकावर उभे राहून त्यांचे डोके पाहात ) बघू बघू– खररंच की ! ( तशी धर्मा खुदकन हसतो ).

**शामकांत :** ( वैतागून ) हास, हास– हसून घ्या लेको आम्हाला—

**धर्मा :** तसं न्हवं शामबाबू– पर —

**शामकांत :** काही बोलू नकोस. जा अगोदर फोन कर तिला. येणार नाही म्हणून सांग. मला हसतोय लेकाचा ! ( धर्मा मोठ्या मुष्किलीने हसू आवरीत स्वतःशीच पुटपुटत जातो. तो गेल्यावर— )

**जाई :** बाबा, ही चांदबिबी म्हणजे—

**शामकांत :** ( वैतागाने ) ए बये– हे चांदबिबीपुराण आता पुरे की ? चलो अब हम लोग कुच न कुच खेलेंगे.

**जाई :** बाबा, आपण भेंड्या लावू या का ? कवितेच्या ?

**शामकांत :** हा हा, लावू या– ए, पण मला कविता बिविता येत नाहीत हं. मी आपली म्हणेन सिनेमातली गाणी—

**जाई :** ( मोठे डोळे करीत ) सिनेमातली गाणी—

**शामकांत :** हो— ( एकदम तारस्वरात " आवारा हूं... टॉरॉरॉरॉ... आवारा हूं... " हे भसाड्या स्वरात एका हिंदी चित्रपटातील गाणे गाऊ लागतात, तोच– )

**जाई :** ( गडबडीने त्यांना थांबवीत ) अहो अहो काय हे ? केवढ्यांदा ? आईनं ऐकलं म्हणजे ?

**शामकांत :** म्हणजे कमालच झाली. सिनेमातली गाणीसुद्धा म्हणायची नाहीत ?

**जाई :** आईला आवडत नाहीत. शेजारी रेडिओवर गाणी लागली तर आई दारं खिडक्यादेखील बंद करून टाकते, आहे माहीत ?

**शामकांत :** बाप रे– मग तुझी आई आता नक्कीच मंत्रिमंडळात जाणार !

**जाई :** असं काय हो बोलता ? भेंड्या नको— आपण लंगडी खेळू या.

**शामकांत :** लंगडी ? नको रे बाबा—

**जाई :** आमचं परवाचं राहिलेलं राज्य देऊन टाका.

**शामकांत :** अग पण—

**जाई :** आपल्यावर डाव आला तेव्हा कसे पळालात ? ते काही नाही, उठा अगोदर,

घ्या आमचं राज्य !

**शामकांत** : ए बये– अग माझ्या पायाला केवढं लागलंय ते पाहिलंस का ? लंगडी खेळायची म्हणजे काय नुसतं पाय वर उचलून नाचायचंय ?

**जाई** : ( एकदम आठवण होऊन ) अय्या ऽ ऽ विसरलेच की !

**शामकांत** : काय विसरलीस ?

**जाई** : ( उत्साहाने ) बाबा, अहो मला नाटकात घेतलंय.

**शामकांत** : नाटकात ? कुठलं नाटक ?

**जाई** : ' बाल ध्रुव.' अहो, आमच्या शाळेचं सांस्कृतिक नाही का—

**शामकांत** : ( वेडेवाकडे तोंड करून उच्चारीत ) सांस्कृतिक ? सांस्कृतिक म्हणजे ?

**जाई** : सांस्कृतिक सांस्कृतिक हो– ? सांस्कृतिक माहीत नाही तुम्हाला ?

**शामकांत** : पण म्हणजे का ऽ य ?

**जाई** : म्हणजे ना... म्हणजे किनई... ऊं... ऊं... उद्या बाईंना विचारून सांगेन.

**शामकांत** : बाईंना तरी ठाऊक आहे का तुझ्या ?

**जाई** : अहो म्हणजे किनई नाटक करायचं, नाच करायचा, गाणी म्हणायची, झालंच तर—

**शामकांत** : त्याला हल्ली शाळेत ' सांस्कृतिक ' म्हणतात का ? छाऽन ! मग कोणतं काम करणार आहात आपण नाटकात ?

**जाई** : बाल ध्रुवाचं. तुम्ही याल पाहायला ? पुढल्या शनिवारी होणार आहे. याल ?

**शामकांत** : तू बोलावलंस तर येईन की !

**जाई** : हात्तिच्या ! तुम्ही आईच्या बरोबर या म्हणजे तुम्हांला आत सोडतील.

**शामकांत** : आईच्या बरोबर ? मीऽऽ ?

**जाई** : माझ्या सगळ्या सगळ्या मैत्रिणींचे आईबाबा कसे बरोबर येतात. तुम्हीच तेवढे येत नाही कध्धी.

**शामकांत** : बरं बरं, येईन मी. म्हणशील तर तुझ्या नाटकात कामसुद्धा करीन मी.

**जाई** : आमच्या नाटकात कसलं हो काम करणार ?

**शामकांत** : का ? मी करीन त्या दाढीवाल्या राजा रविवर्म्याचं काम !

**जाई** : रविवर्मा ? रविवर्मा नव्हे– अहो राजा उत्तानपद.

**शामकांत** : तोच तो– अश्शी दाढी लावीन, अस्सा मुकुट घालीन, अस्सा ऐटीत ( बाकावर बसत ) सिंहासनावर बसेन, सुरुचि राणीच्या बाळाला– ( बोलता बोलता बापलेक रंगात येतात आणि एक वेगळेच नाट्य आकार घेऊ लागते. )

**जाई** : उत्तमाला—

**शामकांत** : उत्तमाला अस्सा मांडीवर घेईन... त्याला अस्सा कुरवाळीन... त्याचे अस्से पापे घेईन... कोण आहे रे तिकडे ! या गोड बाळासाठी खाऊचे पेटारे भरून आणा पाहू– अस्सा हुकूम सोडीन– " बाळ उत्तमा, तू किती गोड मुलगा आहेस रे "

अस्से लाड करीन— आणि मग तू ?

**जाई** : मी ? मग मी ध्रुवबाळ होऊन अश्शी धावत येईन— " बाबा बाबा, मी बसू तुमच्या मांडीवर ? हूं म्हणा— " ये ये बाळ, बैस ! "

**शामकांत** : ( तिला दुसऱ्या मांडीवर बसवून घेत ) ये ये— बाळ, बैस !

**जाई** : ( बाबांच्या मांडीवर ऐटीत बसते. तोच कोणा कल्पित सुरुचीने आडून ढकलून दिल्यागत खाली कोलमडत ) आई ग ऽऽ ! का सुरुचिमाते, मला ढकलून का दिलंस ?

( पुन्हा उठून सुरुचिराणीच्या भूमिकेत ) हा खबरदार ! ध्रुवा, त्या मांडीवर बसायचा तुला अधिकार नाही. तो फक्त उत्तमाचा आहे, समजलास ?

( पुन्हा ध्रुवाच्या भूमिकेत ) मला माझ्या बाबांच्या मांडीवर बसायचा अधिकार नाही ? का ? महाराज माझेदेखील बाबा आहेत, होय ना ?

( पुन्हा सुरुचीच्या भूमिकेत ) महाराज तुझे बाबा असले तरी तुला ते मिळणार नाहीत.

( पुन्हा ध्रुवाच्या भूमिकेत ) पण का ? बाबा, मी काय अपराध केला असा ? म्हणा— बेटा ते तुझ्या आईलाच विचार.

**शामकांत** : बेटा, ते तुझ्या आईलाच विचार !

**जाई** : ( सुरुचिराणीच्या भूमिकेत ) अपराध कोणता ? तू माझ्या पोटी जन्म घेतला नाहीस हाच तुझा अपराध ! तुझी आई तुझ्या बाबांना आवडत नाही हाच तुझा अपराध !

( ध्रुवाच्या भूमिकेत ) बाबा, माझ्या आईनं तुमचा काय अपराध केला असा ? बोला ना बाबा ? तुमच्या मांडीवर मी कधीच का बसायचं नाही ?

( पुन्हा सुरुचीच्या भूमिकेत ) नाही ! नाही ! नाही ! ध्रुवा— या बाबांची मांडी तुला हवी असेल तर त्या दुष्ट सुनीतीला सोडून तू माझ्या मंदिरात राहायला ये. तिचं तोंड पाहणार नाही कधी अशी शपथ घे.

( पुन्हा ध्रुवाच्या भूमिकेत ) ते कदापि शक्य नाही ! मी माझ्या आईला कधीच सोडणार नाही.

( पुन्हा सुरुचीच्या भूमिकेत ) करंट्या, मग राहा जन्मभर दरिद्री. ती आई हवी असेल तर तुला हे बाबा कधीच मिळणार नाहीत. बोल, तुला आई हवी की बाबा हवेत ?

( पुन्हा ध्रुवाच्या भूमिकेत ) मला आई हवी आणि बाबाही हवेत.

( पुन्हा सुरुचीच्या भूमिकेत ) मग वेड्या— देवाची तपश्चर्या कर आणि देवाला प्रसन्न करून घे आणि मी सांगते तो वर माग. म्हणावं मला पुन्हा जन्म दे आणि देशील तो सुरुचि राणीच्या पोटीच दे. म्हणजे तुला आईही मिळेल आणि बाबाही मिळतील.

**शामकांत** : बाळ—

**जाई** : नको बाबा— माझ्या आईचा अपमान झाला. आता नको मला तुमची मांडी.

मी आता खरोखरच रानात जाईन, तपश्चर्या करीन आणि देवाला प्रसन्न करून वर मिळवीन.

**शामकांत** : ब्रॅव्हो ! ब्रॅव्हो ! फर्स्टक्लास,– पोरी, फर्स्टक्लास !

**जाई** : थांबा थांबा. इतक्यात झालं नाही काही ! आता तुम्ही देव.

**शामकांत** : कोण मी ? आणि देव ?

**जाई** : मधे मधे बोलू नका हो. आता तुम्ही देव. हूं. उभे राहून अस्सा हात पसरून म्हणा–पुरे पुरे, बाळा, तुझी खडतर तपश्चर्या पाहून मी प्रसन्न झालो आहे. बोल, तुला हवा तो वर मागून घे !

[ तशी शामकांत देवाच्या भूमिकेत उठून उभे राहतात आणि– ]

**शामकांत** : पुरे पुरे ! बाळा, तुझी खडतर तपश्चर्या पाहून मी प्रसन्न झालो आहे. बोल, तुला हवा तो वर मागून घे.

**जाई** : देवा, तुम्ही मला काय देणार ?

**शामकांत** : म्हणशील तर तुझ्या वडिलांच्यापेक्षा मोठं–सबंध विश्वाचं राज्य देतो मी तुला.

**जाई** : नको. असलं राज्य घेऊन मी काय करू ! देवा, आई म्हणते की मुलांनी पाप केलं म्हणजे देव त्यांना शिक्षा करतो. खरं का हे ?

**शामकांत** : अगदी खरं आहे बाळ !

**जाई** : मग मला सांगा देवा, मी असं कोणतं पाप केलं म्हणून तुम्ही मला ही शिक्षा केलीत ? सांगा ना ? देवा–तुम्हाला आई आहे का हो ? देवा–तुम्हाला बाबा आहेत का हो ? तुमच्या बाबांनी तुमच्या आईचा अपमान केला असता तर देवा, तुम्ही काय केलं असतंत हो ? बोला ना ? सुरुचिमाता मला म्हणाली की–ध्रुवा, तुला तुझी आई हवी असली तर तुझे बाबा मिळायचे नाहीत ! असं का ? देवा, मला सांगा बरं, असं का ?

**शामकांत** : पण बेटा ध्रुवा—

**जाई** : मधेच नाही बोलायचं देवा, माझं संपू दे.

**शामकांत** : आई हवी असली तर बाबा मिळायचे नाहीत ?

**जाई** : ( नाटक विसरून ) ध्रुवानं असं का विचारलं हो बाबा ? त्याचे बाबादेखील तुमच्यासारखे दुसऱ्या घरात रहात होते ?

[ शामकांताच्या डोळ्यांत चटकन् पाणी उभे राहते. तशी नाटकाची मयसृष्टी विरघळून जाते. जाई उठते आणि शामकांतांना एकदम बिलगत— ]

अहो, अहो तुम्ही रडताय काय ? देवानं रडायचं नाही काही–ध्रुवानं रडायचं असतं !

**शामकांत** : ( डोळे टिपत ) पोरी, तुझं भाषण ऐकून देवसुद्धा रडतील !

[ तेवढ्यात जाईचे लक्ष मागे जाते, मंगला कधीची येऊन उभी आहे, तिला पाहताच— ]

दि. ...... नाटक

**जाई** : आई, तू केव्हा आलीस ?
**शामकांत** : ( दचकून ) मंगला—
**मंगला** : ( पुढे येत हसून ) तुमचं नाटक चाललं होतं तेव्हाच !
**शामकांत** : कोणी लिहिलंय हे नाटक ?
**जाई** : ( उत्साहाने ) अहो सांगू का—आपल्या आ—
**मंगला** : ( डोळे वटारीत ) जाईऽऽ
**जाई** : अग लोकांना नाही—फक्त आपल्या बाबांनाच सांगतेय मी !
**शामकांत** : तुझ्या आईनं लिहिलंय ? मग नुसतंच नाटक नव्हे हे.
**जाई** : नाटक नव्हेऽऽ ?
**मंगला** : वेडे आहेत तुझे बाबा !
**शामकांत** : खरं आहे ! खरं आहे ! म्हणूनच चटका बसला ! चांगला झणझणीत चटका बसला, जाई !
**जाई** : ( विस्मयाने ) चटका ? चटका कसला हो ? इथं कोणी तरी उदबत्तीशी खेळतंय वाटतं ?
**शामकांत** : ( सिगारेट शिलगावीत ) अग उदबत्तीचा चटका पुरवला. पण शब्दांचे चटके सोसवत नाहीत. अगदी पळकेच काढतात. शेवटपर्यंत जळत जातात शब्द.
**मंगला** : ( हसून ) सिगारेटसारखे ?
**शामकांत** : ( दचकून भानावर येत ) ओऽ आय ॲम सॉरी ! ( सिगरेट पायाखाली टाकून विझवीत ) सो सॉरी ! लक्षातच आलं नाही.
**मंगला** : सहज म्हटलं मी. विझवायची काही जरुरी नव्हती.
**जाई** : ' शब्दांचे चटके ' म्हणजे काय ग आई ?
**मंगला** : म्हणजे काही नाही. तिकडे झोपाळ्यावर प्रसाद मुलांच्यात खेळतोय—
**जाई** : त्याच्याशी जाऊन खेळू मी ?
**मंगला** : हुं.
( जाता जाता थबकून वळून )
**जाई** : बाबांशी बोलायचंय तुला ?
**मंगला** : हो. थोड्या वेळात येते मी. अंधार पडायच्या आत घरी जायचं हं आपण.
**जाई** : बाबांना घेऊन ? सांग ना ? मला तू कबूल केलं आहेस. बाबांनीदेखील कबूल केलंय मला.
**मंगला** : ( शामकांत आणि मंगला चमकून परस्परांकडे बघतात ) हो.
**जाई** : ( झटकन् शामकांतांच्यापाशी जात ) कानात सांगायचंय. खाली वाका नं ?
**मंगला** : काय गुप्त गोष्ट सांगायचीय एवढी ?
**जाई** : तू ऐकायची नाहीस हं. ( शामकांत वाकून कान पुढे करतात. जाई शामकांतांच्या कानात ' किनई... ' अशी सुरुवात करून काही तरी सांगते. मग शामकांत

खुणा आणि आविर्भाव करून विचारतात–" मी ? कान उपटून नाक घासू ? " जाई मानेनेच होय म्हणते. शामकांत हसत हसत " बरं ! बरं ! " म्हणतात. जाई उड्या मारीत निघून जाते. )

**मंगला :** काय सांगत होती जाई ?

**शामकांत :** म्हणाली की कान उपटून नाक घासून आईपुढे चुकतो म्हणा,. म्हणजे ती तुम्हाला घरात परत घेईल !

**मंगला :** ( खिन्नपणे हसत ) भाबडी असतात मुलं.

**शामकांत :** खरं आहे. मोठ्यांचे ' पीळ ' उमजायला अवकाश आहे तिला.

**मंगला :** नुसते पीळच नव्हे, लबाडीदेखील.

**शामकांत :** उभ्या उभ्याच बोलणार ?

**मंगला :** नाही, बसू या की. ( बाकावर बसू लागते. शामकांत जमिनीवर बसतात ते पाहून ) इश्श—जमिनीवर काय बसलात ? कपडे मळायचे नाहीत ?

**शामकांत :** ( खुषीत येत ) मळू देत—आज कपड्यांची काय मातब्बरी ? असं वाटतं या हिरवळीवर नाचावं, बागडावं—चौफेर धावत सुटावं !

**मंगला :** इतका आनंद कसला झालाय ?

**शामकांत :** आनंद नव्हे— आठवण झाली एक !

**मंगला :** आठवण ?

**शामकांत :** चौदा वर्षांपूर्वीची. एक तरुण अल्लड मुलगी याच जागी, अशाच धूसर वेळी मला असंच काहीसं म्हणत असे. नुसतं म्हणून थांबायची नाही, तर ती माझ्या हाताला धरून—

**मंगला :** ( स्मृतींनी भारावून ) शाम—

**शामकांत :** ( थरारून ) ओ—गॉड ! किती युगांनी ऐकली ही हाक !

**मंगला :** ( नकळत त्याच्या शेजारी बसत ) ती मुलगी आता तरुणही राहिली नाही आणि अल्लडही उरली नाही.

**शामकांत :** ( दिव्याच्या खांबाकडे बोट दाखवीत ) त्या तिथं नारळाचं उंच उंच झाड होतं. उडत उडत त्याच्या शेंड्यावर जाऊ या—असं म्हणायची ती.

**मंगला :** त्या वेळी तिला पंख होते.

**शामकांत :** तिनंच मलाही पंख दिले होते.

**मंगला :** आता तिचे पंख जळाले.

**शामकांत :** माझेही तुटून पडले.

**मंगला :** पुन्हा आपले दोघे बदकन् पडलो मातीत.

**शामकांत :** नुसते मातीत नव्हे— दोघे दोन ध्रुवांवर !

**मंगला :** आणि आता ते झाड तरी कुठं उरलंय ! तिथं उभा आहे हा दिव्याचा लोखंडी खांब !

**शामकांत :** झाड तोडणारा अरसिकच असला पाहिजे, नाही ?
**मंगला :** झाड तोडल्याशिवाय दिव्यांचा खांब कसा उभा राहील ?
**शामकांत :** खरंच...आता पूर्वीसारखी ही निर्जन निवांत टेकडी उरली नाही. एका उद्यानानं आपला प्रपंच थाटलाय या जागेवर.
**मंगला :** प्रपंचात एवढी मोडतोड चालायचीच.
**शामकांत :** माणसांचीदेखील ?
**मंगला :** माणसं मोडत नाहीत; घाव बसले की ती वाकतात.
**शामकांत :** सगळीच वाकत नाहीत. माझ्यासारखी काही मोडतात–उन्मळतातदेखील.
**मंगला :** आणि माझ्यासारखी वाकतात–अगदी भुईला नाक टेकतात.
**शामकांत :** एक मोडलेलं झाड, एक वाकलेलं झाड ! (हसतात.)
**मंगला :** हसायला काय झालं ?
**शामकांत :** किती दिवसांनी आपण त्या वेळसारखं बोललो ?
**मंगला :** खरंच, किती तरी वर्षांनी !
**शामकांत :** पण त्या वेळी आपण जवळ होतो. शब्दांशिवायच एकमेकांना जाणून घेत होतो.
**मंगला :** खरं आहे. आता नुसते शब्दच उरले.
**शामकांत :** शब्द बोलणारी माणसं तरी कुठं पूर्वीची उरली ?
**मंगला :** कोण माणसं बदलली ? का बदलली ?
**शामकांत :** तेच कळत नाही.
**मंगला :** न कळण्यासारखं त्यात काही नाही.
**शामकांत :** मी तरी हा वेडाखुळा दुबळा कलंदर पूर्वीसारखाच आहे !
**मंगला :** दिसेल त्या फुलावर झडप घालणारा ?
**शामकांत :** नव्हे–दिसेल त्या ज्योतीवर झेप घेऊन स्वतःचे हातपाय पोळून घेणारा.
**मंगला :** हातपाय पोळले म्हणजे लहान मुलंदेखील शहाणी होतात.
**शामकांत :** सगळीच नव्हे. काही थोडी शहाणपणं शिकतात. माझ्यासारखी वेडीखुळीं जन्मभर हातपायच भाजून घेत राहतात.
**मंगला :** पण कळून सवरून हे का ?
**शामकांत :** का– तेच समजत नाही. तेच कोडं उलगडत नाही.
**मंगला :** स्वतःच्या दुबळेपणाचं हे समर्थन आहे.
**शामकांत :** करारी माणसांचा हा नेहमीच युक्तिवाद आहे.
**मंगला :** पण माणसं काही उपजतच करारी निपजत नाहीत. त्यांनाही स्वतःशी झगडावं लागतं. निग्रहानं मनाला वेसण घालावी लागते.
**शामकांत :** होय– पण त्यात यशस्वी होण्याइतकी ती भाग्यवानही असतात.
**मंगला :** तुम्ही पूर्वी असे दुबळे नव्हता. इतक्या सहज मोहवशही होत नव्हता.

**शामकांत :** तुझी काय कल्पना आहे ? मी असा केव्हा झालो ? लग्नानंतर ?
**मंगला :** नव्हे— जाईच्या जन्मानंतर.
**शामकांत :** जाईच्या जन्मानं असा काय फरक पडला ?
**मंगला :** मी आई झाले. पण तुम्ही बाप झाला नाहीत. वृत्तीनं फुलपाखरासारखेच राहिलात.
**शामकांत :** म्हणजे होतो तसाच राहिलो !
**मंगला :** नव्हे— संधी मिळाली तेव्हा जास्तच बहकलात.
**शामकांत :** जाईच्या जन्मापूर्वी संधी मिळत नव्हती ?
**मंगला :** त्या वेळी माझ्या दृष्टीचा खडा पाहारा होता तुमच्या भोवती.
**शामकांत :** आणि प्रेमाचादेखील.
**मंगला :** मूल झालं म्हणून कधी बायकोचं प्रेम मावळतं ?
**शामकांत :** निदान त्याचं रूप बदलतं, आणि नवऱ्यावरला पाहारा ढिला होतो.
**मंगला :** बायकोनं काय जन्मभर नवऱ्यावर पहाराच करायचा असतो ?
**शामकांत :** कायद्याच्या भूमिकेवरून या प्रश्नाला काही उत्तरच नाही, मंगल !
**मंगला :** हा कायद्याचा प्रश्नच नाही शाम; साध्या परस्परांतील समजुतीचा, सहृदयतेचा आणि एकमेकांतील गाढ प्रेमाचा आहे !
**शामकांत :** मलाही तसंच वाटतं, पण एखाद्या पक्षाघात झालेल्या माणसाच्या बायकोलाही असाच प्रश्न करता येईल. तिनं तरी जन्मभर पांगळ्या नवऱ्याची सेवा-शुश्रूषाच करायची का ?
**मंगला :** पक्षाघाताची गोष्ट वेगळी आहे. माणूस शरीरानं पांगळा होतो त्या रोगात.
**शामकांत :** इच्छाशक्तीचा पक्षाघातही तसाच आहे. व्यसनी माणूस रुग्णाईत असतो मंगल, गुन्हेगार नव्हे.
**मंगला :** मला नाही वाटत तसं.
**शामकांत :** माझं दुर्दैव—दुसरं काय म्हणू ?
**मंगला :** पण तुम्ही पूर्वी असे नव्हतात. निदान त्या वेळी तरी नव्हता !
**शामकांत :** मंगल, मी आज ' आहे ' तसाच त्या वेळीही ' होतो'. पण जसा ' होतो ' तसा तुझ्यापुढे कधी सगळा प्रकट झालो नव्हतो.
**मंगला :** म्हणजे मला फसवलंत ?
**शामकांत :** फसवलं नाही. मीच फसलो. मी कसा आहे, ते माझं मलाच पुरतं कळलं नव्हतं.
**मंगला :** आणि आता ते कळलं ?
**शामकांत :** बहुतेक कळलं. आता थोडा शोध बाकी उरलाय.
**मंगला :** आणिक काय कळायचं राहिलंय ?
**शामकांत :** एका असावध क्षणी माझ्या मानगुटीवर बसलेला हा सिंदबादचा म्हातारा

मला कधी जिवंत सोडणार आहे की नाही ते मला पाहायचंय.

**मंगला** : सिंदबादचा म्हातारा ?

**शामकांत** : होय. माझ्या इच्छेविरुद्ध दुनियेत त्यानं माझी धिंड काढलीय, मंगल !

**मंगला** : इतका छान विचार करता तुम्ही, मग—

**शामकांत** : सिंदबादच्या म्हाताऱ्याला कळत नाहीत हे विचार.

**मंगला** : किती अलिप्तपणानं विचार करता तुम्ही स्वतःबद्दल ?

**शामकांत** : त्याचं कारण या क्षणातला मी वेगळा आहे मंगल.

**मंगला** : वेगळा ?

**शामकांत** : होय. माझ्या मानगुटीवरला म्हातारा झोपलाय. तो झोपी जातो तेवढ्या घडीभरापुरता तरी माझा मी, मी असतो.

**मंगला** : अशी घडी उगवते का कधी ?

**शामकांत** : किती तरी वेळा. रोज निदान एकदा तरी.

**मंगला** : मग अशा वेळी तुम्ही काय करता ?

**शामकांत** : एकटा असलो तर किलकिल्या डोळ्यांनी स्वतःलाच न्याहाळत बसतो. मनातल्या मनात जळत कुढत राहतो. हताशपणे दुबळे संकल्प उच्चारू लागतो. नाही तर मग धर्माशी भांडण उकरून काढतो.

**मंगला** : धर्माशी भांडण ?

**शामकांत** : हो— आणि त्याच्याकडून सपाटून शिव्याशाप खातो. त्याच्या शिव्याही मला गोड लागतात. नाही तर इथं येऊन मुलांशी खेळत बसतो आणि स्वतःला विसरण्याचा प्रयत्न करतो.

**मंगला** : तेवढ्या बाबतीत तुम्ही माझा पराजय केलात.

**शामकांत** : पराजय कसला ?

**मंगला** : मुलांच्यासाठी मी वेगळं घर केलं पण त्यांचा सगळा ओढा तुमच्याकडं.

**शामकांत** : तुला वाटतं तसं. पण तोही भ्रम उरला नाही माझा आता.

**मंगला** : कशावरून ?

**शामकांत** : माझ्याकडं तुला सोडून यायला जाई बिलकुल तयार नाही. तिनं स्वच्छच सांगितलं मला आज.

**मंगला** : तिला तुम्ही तसं विचारायलाच नको होतं.

**शामकांत** : खरं आहे. चुकलंच ते माझं ! सगळंच चुकत गेलं— त्यात या आणखी एका चुकीची भर. ( खिन्नपणे हसतात. )

**मंगला** : तसं नव्हे, पण—

**शामकांत** : मला फार आश्चर्य वाटतंय मंगला—

**मंगला** : आश्चर्य कसलं ?

**शामकांत** : इतक्या शांतपणानं आजच तू माझ्याशी हे सगळं कशी बोलते आहेस ?

**मंगला** : का ? पूर्वी मी शांत नव्हते ? सोशीक नव्हते ? गरीब नव्हते ?

**शामकांत** : तशी खरीच असतीस तर मला वाऱ्यावर सोडून तू अशी निघून गेली असतीस ?

**मंगला** : शाम–प्रश्न माझ्या एकटीचाच असता तर मी हवं ते सोसलं असतं. सोसलं–सोसत होतेही. पण दोन मुलांची मी आई झाले–बेहोषीत तुझा धिंगाणा घरात सुरू झाला की मुलं कशी भयभीत होत असत ते तू कधी पाहिलं नाहीस.

**शामकांत** : कल्पना आहे त्याची मला !

**मंगला** : माझ्यावरल्या आघातांची मला कधी क्षिती वाटली नाही. पण घरातल्या प्रकारामुळं मुलांची मनं करपून जायला लागली तेव्हा—

**शामकांत** : झटकन् निर्णय घेऊन तू घर सोडलंस.

**मंगला** : (हसून) झटकन् ? तेच तुला माहीत नाही. (डावं मनगट दाखवीत) इतके डाग मला द्यावे लागले.

**शामकांत** : (थरारून) मंगला—

**मंगला** : मन घट्ट करण्यासाठी.

**शामकांत** : म्हणजे तू...तू...

**मंगला** : तेव्हापासून माझी मी, मी राहिले नाही. करारीपणाचं उसनं अवसान, एक मुखवटा धारण करून या एकाकी संसारात उभी आहे मी शाम.

**शामकांत** : उसनं अवसान ? मुखवटा ? म्हणजे तू...तू... देखील—

**मंगला** : दुबळा तू नाहीस—दुबळी मी आहे शाम—

**शामकांत** : नाही नाही—मंगला, तू दुबळी नाहीस.

**मंगला** : मी दुबळी होते म्हणूनच मी तुला गमावला. तुला गमावला तशी मुलं गमावू नयेत म्हणून वेगळ्या घराची ही जिवापाड उडी मी घेतली. मन मारून घेतली. पण मन मारून मरत नाही, शाम, जाळून पोळूनही मन मरत नाही. जरा आशा दिसली, ओल सापडली की पुन्हा मनाला कोंब फुटतात—

**शामकांत** : खरंच ?

**मंगला** : एरवी सगळे मुखवटे फेकून मी तुझ्याकडं आज का धावले असते ?

**शामकांत** : माझी कल्पना फार वेगळी होती मंगल. मला वाटलं आज तू आलीस ती माझी रागानं निर्भर्त्सना करण्यासाठी.

**मंगला** : (खिन्नपणाने हसून) राग ? त्या रागापलीकडं गेलेय मी आता शाम. माझं भांडण आता तुझ्याशी नाही. देवाशी आहे !

**शामकांत** : (हसून) देव ?

**मंगला** : देवावर तुझा विश्वास नाही, पण माझा आहे शाम—

**शामकांत** : मंगला, मला तुझा हेवा वाटतो त्यासाठी.

**मंगला** : देवानं तुला इतके चांगले चांगले गुण दिले आणि—

**शामकांत :** सगळ्याची माती करणारं हे दुबळं मन का दिलं ?... असंच ना ?

**मंगल :** नाही. तुला सांभाळू शकणारी शहाणी समर्थ बायको का दिली नाही ? (हुंदका देते.)

**शामकांत :** (गहिवरून) वेडी आहेस तू मंगला. माझ्या आयुष्यात बायका अनेक आल्या गेल्या—पण बायको मात्र एक तूच !

**मंगला :** शाम—

**शामकांत :** कृपा कर. पाया पडतो मी तुझ्या, पण माझ्या तेवढ्या नाजुक भावनेला शब्दांनंहि धक्का लावू नकोस.

**मंगला :** तसं नव्हे शाम—

**शामकांत :** पुरे— त्याबद्दल आता बोलूसुद्धा नकोस.

[क्षणार्ध स्तब्धता. दोघेही डोळे पुसतात. तेवढ्यात पटकन् मर्क्युरी लॅंप लागतो आणि आसमंतात निळसर प्रकाश पडतो. तो पाहून— ]

किती सुंदर प्रकाश पसरलाय नाही. चौदा वर्षांपूर्वी यातलं काही नव्हतं. इथं त्या वेळी होता फक्त अंधार !

**मंगला :** पण इथंच ते नारळीचं उंच उंच झाड उभं होतं, नाही ?

**शामकांत :** (उठतो आणि दिव्याच्या खांबापाशी जात तो खांब हाताने कुरवाळीत) आणि उडत उडत आपण शेंड्यावर जाऊ या—असं तू म्हणत होतीस.

**मंगला :** त्या वेळी मला पंख होते, शाम.

**शामकांत :** आणि तू मलाही पंख दिले होतेस, मंगल—

**मंगला :** पण माझे पंख आता जळाले.

**शामकांत :** माझेही तुटून पडले. दोघे बदकन् पडलो मातीत.

**मंगला :** आता पुढं ?

**शामकांत :** पुढं काय ?

**मंगला :** खरंच—पुढं काय ?

**शामकांत :** पुन्हा आकाशात झेप घ्यायची ?

**मंगला :** पुन्हा स्वप्नं रंगवायची ?

**शामकांत :** ती स्वप्नाळू डोळ्याची अल्लड मंगला कुठाय ?

**मंगला :** तो उमद्या वृत्तीचा तडफदार शाम कुठाय ?

(दोघेही परस्परांकडे रोखून पाहतात—जणू हरपले श्रेय शोधतात आणि मग–)

**शामकांत :** (घुटमळत) तो शाम—ती मंगला—

[तोच गाडीचा हॉर्न ऐकू येतो]

**शामकांत :** (हॉर्न ऐकताच दचकून) हॉर्न ? हॉर्न वाजला का ?

(उठून पाहात) ओ गॉड ! गाडी घेऊन आली वाटतं. घड्याळात पाहात हसत) बरोबर साडेसात वाजले. दॅटस् लाइक लता !

**मंगला :** गाडी कोणाची ? स्टूडियोतली ?

**शामकांत :** नाही, लताची.

**मंगला :** तुम्हाला घेऊन जाण्यासाठी ती आलीय ?

**शामकांत :** अर्थात. मला घेऊन जाण्यासाठी रोजच ती येते. स्टूडियोत नाही तर इथं बागेत. तो तिचा अगदी हट्ट आहे.

**मंगला :** तुम्ही मुलांना भेटायला इथं येता हे तिला माहीत आहे ?

**शामकांत :** तिला माहीत नाही असं माझ्या आयुष्यात काहीही उरलेलं नाहीये.

**मंगला :** तिनं कधी तुम्हाला अडवलं नाही ?

**शामकांत :** आरंभी प्रयत्न करून पाहिला. पण पुढं तीच म्हणाली— 'जाणाऱ्याचे पाय धरून ठेवले तरी मनाला वेसण कोण घालणार ? '

**मंगला :** बरंच शहाणपण आहे म्हणायचं तिच्याजवळ ?

**शामकांत :** यात शंकाच नाही. एरवी या धंद्यात ती टिकलीच नसती.

**मंगला :** तुमचा जीव मुलांच्यात गुंतलाय याचा तिला राग येत नाही कधी ?

**शामकांत :** राग येऊन उपयोग काय ? मी मुलांना भेटायसाठी इथं आल्यावाचून कधीही राहणार नाही, हे तिला पूर्ण कळून चुकलंय.

**मंगला :** तिला चालतं ते ?

**शामकांत :** मी तिला हवा असलो, तर ते चालवून घेतलं पाहिजे— हे तिला पुरेपूर कळलंय. मी आहे तसा तिनं मला पत्करलंय.

**मंगला :** हे ' चालवून घेणं ' आणि ' आहे तसा पत्करणं ' मला कधी जमलं नाही—

**शामकांत :** आणि जमणारही नाही. (हसतो) दॅट मेक्स ऑल द डिफरन्स.

**मंगला :** इतकी समंजस बाई तुम्हाला भेटलीय, तर माझ्याशी घटस्फोट घेऊन लग्न का नाही करीत तुम्ही तिच्याशी ?

**शामकांत :** लग्न ? फार मोठा प्रश्न उपस्थित केलास तू. याँ प्रश्नाचं उत्तर काही मी तुला देणार नाही. अगदी खरं खरं उत्तर दिलं तरी ते तुला पटणार नाही. लेट अस फरगेट इट !

**मंगला :** नाही; मला उत्तर मिळायलाच हवं. त्या उत्तरावर मला माझं उभं आयुष्य काढायचंय. पटणार नसेल तरी सांगा.

**शामकांत :** ऑल राइट. लिसन, मी पूर्वी म्हणालो होतो तेच पुन्हा म्हणतो— मंगला, माझं तुझ्यावर प्रेम आहे. फार फार प्रेम आहे, पण...एकत्र राहून सुखानं सारं करायला नुसतं प्रेम पुरत नाही. फार फार वेगळ्या कोरड्या निष्ठा लागतात. वेगळेच मनोधर्म लागतात, खरं एकच आहे, मंगला, आपण एकमेकांसाठी नाही घडलो— दॅटस् ऑल.

**मंगला :** आणि तुम्ही दोघं एकमेकांसाठी घडला आहात ?

**शामकांत :** छे छे...त्याही भ्रमात मी नाहीये, या घडीपुरतं हे चित्र असं रंगलंय...

पण उद्याची शाश्वती कोणी द्यावी ? नो ऽ ऽ...नेव्हर—तेव्हाऽऽ—

[तेवढ्यात धर्मा प्रवेशतो आणि—]

**धर्मा** : चला शामबाबू. मी म्हनलो तसं तस्सं जालं. लताबाई गाडी घेऊन जातीनं आल्या. आता— (प्रथमच मंगलेला पाहून चकित होत) बाईसाव आपुन ?

**शामकांत** : बराय मग—मी येतो आता...पुन्हा—

**मंगला** : (व्याकळून) शाऽम—

**शामकांत** : एक्स्क्यूज मी मंगल...ही सायंकाळ विसरू या आपण. स्वप्नात घडल्यासारखी एका स्वप्नातच ठेवू या.

**मंगला** : अरे आत्ता कुठं आपल्यात संवाद सुरू झालाय—

**शामकांत** : इटस् टू लेट...फार उशीर झालाय. मला जायला हवं.

**मंगला** : अगदी जायलाच हवं का ?

**शामकांत** : (कष्टानं) हो, जायलाच हवं. आपले मार्गच वेगळे आहेत असं नाही मंगल, तर आपले ध्रुवही दोन टोकाला आहेत.

**मंगला** : पण आज नाही गेलं तर नाही चालायचं ?

**शामकांत** : छे छे—कसं शक्य आहे ?

**मंगल** : जाईला फार वाईट वाटेल रे—

**शामकांत** : जाईची गोष्ट सोड. हा घाव मी तुझ्यावर घालतो आहे; आणिक माझ्यावरदेखील. पण एव्हरीबडी मस्ट बेयर हिज ओन क्रॉस; बराय— गुड बाय अँड गुडलक टु यू....

[पाठ वळवून शामकांत जातो. धर्मा सुन्नपणे बघतच उभा राहतो. दूरवर मोटर गेल्याचा आवाज. मंगला हताशपणे शून्यमनस्क होत बाकावर बसते. बाकाच्या पाठीवर डोके टेकवून मूकपणे अश्रू ढाळते. ते पाहून—]

**धर्मा** : माफी करा बाई. माजंच चुकलं.

**मंगला** : (पदराने डोळे पुसून वर पाहात) ऊं ? काय म्हणालास ?

**धर्मा** : माजंच चुकलं. मी—

**मंगला** : नाही धर्मा— तुझं चुकलं नाही. कोणाचंच चुकलं नाही.

**धर्मा** : असं कसं ? मी—

**मंगला** : (जाण्याच्या तयारीने उठत) तसंच ! मी आता पुरती जागी झालेय. जा धर्मा, तू जा आता. त्यांच्या मागं जा.

**धर्मा** : त्येंच्या मागं मी कुटं कुटं जाऊ बाई ?

**मंगला** : नेतील तिकडं जा.

**धर्मा** : नेत्याल तकडं ?

**मंगला** : हो— अगदी टोकापर्यंत. माझ्यापेक्षा तुझ्याच सोबतीची त्यांना आता गरज उरलीय, कदाचित तूच त्यांना सावरू शकशील.

**धर्मा :** ही तुमची आशा मातर येडी हाय !

**मंगला :** अरे आशा वेडीच असते. म्हणून तर माणसं जन्मभर धडपडत राहतात. ऊठ बाबा, ऊठ. तुला आणि मला असं हातपाय गाळून चालायचं नाही.

**धर्मा :** आपुन कुठं जानार बाई ?

**मंगला :** मी ? मी कुठं जाणार ? माझे पाय इथंच रुतले आहेत धर्मा ! मला माझा ध्रुव सांभाळलाच पाहिजे ! [ तेवढ्यात जाई उत्साहाने, "बाबा...बाबा..." अशी हाक मारीत धावत येते आणि—]

**जाई :** बाबा, प्रसाद म्हणतो की–( थबकते. विस्मयाने पाहात ) बाबा ?

**मंगला :** चल जाई, घरी जाऊ या आपण !

**जाई :** आणि बाबा कुठं आहेत !

**मंगला :** ते गेले !

**जाई :** ( एकदम थिजत ) गेले ? कुठं गेले ?

**मंगला :** त्यांच्या घरी.

**जाई :** त्यांच्या घरी ? त्यांच्या ? पण आई, तू तर म्हणाली होतीस की—

**मंगला :** ते सगळं खोटं होतं.

**जाई :** खोटं ? खोटं ? नाही, नाही–तू कधी खोटं बोलणार नाहीस. आई मला बाबा देखील म्हणाले होते की—

**मंगला :** तेही खोटं होतं !

**जाई :** ( चिडून रडवेली होत ) नाही नाही– मोठी माणसं कधी खोटं बोलतात ? ( आईला गदागदा हालवीत ) सांग ना– मोठी माणसं कधी खोटं बोलतात ?

**मंगला :** ( व्याकळून ) जाई– चल घरी जाऊ या आपण. घरी सांगते मी तुला सगळं.

**जाई :** नाही नाही– बाबांना घेतल्याशिवाय मी नाही घरी येणार.

**मंगला :** ते येणार नाहीत.

**जाई :** त्यांना ओढून घेऊन जाऊ या आपण.

**मंगला :** तेवढं बळ माझ्यात नाही आणि तुझ्यातही नाही.

**जाई :** ( केविलवाणी होत ) बाबा आपल्या घरी आता येणार नाहीत !

**मंगला :** [ मानेनं नाही म्हणून सांगते. ]

**जाई :** कध्धी कध्धी कध्धी येणार नाहीत ?

**मंगला :** नाही.

**जाई :** ( बसकण मारीत उमग्न रडत ) पण का ?...असं का ?...का ?... का ? असं का ?...

**मंगला :** ( तिला मायेने पोटाशी घेत ) ऊठ. असं वेड्यासारखं करू नये. शहाणी ना तू ?....लोक म्हणतील शहाण्यासारखं समजूतदारपणानं वागणारी जाई ती हीच का ?...चल ऊठ.

**जाई :** ( रडत हातपाय घासत ) पण का ?...असं का ते सांग !...आधी सांग !... का ? का ?

**मंगला :** सांगते— पण आधी ऊठ पाहू...शहाणी आहे माझी बाबी...प्रसाद वाट बघत बसेल ना तिकडं ?...चल ऊठ...तिनीसांजा झाल्या— घरी जायला हवं आपल्याला...

[ हातपाय घासत आकांत करणाऱ्या जाईची मंगला कमालीच्या शांतपणाने समजूत घालीत उठवून तिला हाताला धरून घेऊन जाते. जाई जाता जातानाही रडत रडत " असं का ? का ते सांग ?..." असा प्रश्न विचारीतच जाते तिच्याबरोबरच " का ? असं का ? " हा प्रश्नही दूर दूर अस्पष्ट ऐकू येत जातो. इतका वेळ दिव्याच्या खांबाशी सुन्नपणे हा सगळा प्रकार बघत उभा असलेला धर्मा दुसऱ्या बाजूने जाण्यासाठी पाऊल उचलतो. जाता जाता स्वतःशीच तो मान हालवीत पुटपुटतो— " असं का ?...खरंच हे असं का ?..." आणि त्याच वेळी— ]

**प ड दा**

प्रेक्षकांना विचार करायला लावणारं हृदयस्पर्शी नाटक । व्यक्तिमनाचे विश्लेषण दर्दभरे दर्दी नाटक — प्रा. विजय कुलकर्णी

म. श्री. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
दा. क्र. २०५००  नों. दि. २/९९/८
वि. नाटक  क्र.

IRBK-0120590

उत्तम कलाकृती साहित्यिकाकडून

नम स्कार

Sachin W. Mhaske

एक विलक्षण उत्तम नाटक !

वामन चोरघडे.